

# श्री साईलील

या अंकांत—


- देवानें संकटमुक्त केलें
- 'मर्जी देवाची, मिथ्या धाव मनाची'
- सर्वांभूतीं समभाव
- लो. टिळकांचे पुण्यस्मरण
- साधक आणि श्रीसाई
- मानवी तेंच दैवी व तेंच मानवी
- धार्मिक ग्रंथांचे पहिलें, महाराष्ट्रीय प्रकाशक
- धर्मात्मा शेठ जावजी दादाजी
- एकांताचे सुख देई मज देवा
- संतश्रेष्ठ ज्ञानदेव महाराज
- भरताचें निस्सीम बंधुप्रेम
- श्री एकनाथ महाराज आणि चमत्कार



० पैसे

ऑगस्ट १९६७

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७३१



# श्री साई वाक्सुधा

समुद्राचें पाणी खार असतें नाहीं का? परंतु तें मेघांच्या सान्निध्यांत येतांच गोड अमृत होतें. पावसाच्या रूपानें तें आपणांस प्राप्त होतें. त्याचप्रमाणें आपण निरखून–पारखून ज्याला गुरुस्थान दिलें असेल त्याच्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवली पाहिजे. त्याच्या कृपेला पात्र झालें पाहिजे. या नरदेहाचें सार्थक गुरुपदेशांत व त्याप्रमाणें श्रद्धेनें वागण्यांत आहे. तेव्हां प्रत्येकानें गुरुकृपेस पात्र झालें पाहिजे.

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ]     ऑगस्ट १९६७     [ अंक १७ वा

: संपादक :

**श्री. द. वि. पाटणकर**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

**टे. नं. ४४३२६१**

: कार्यालय :

**साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.**

# प्रिय वाचक—

ईश्वरानें आपणास हा जो मानवजन्म दिला तो उगाच लाभास आलेला नाही. अनेक जन्मींचें पुण्यकर्म त्याला कारण झाले आहे. हें जाणून या जन्मीं आपण प्राप्त झालेल्या नरदेहाचें सार्थक करण्यासाठीं मनोभावें झटलें पाहिजे. या आयुष्यांतील प्रत्येक घटका सत्कारणीं लागेल, एकही क्षण वायां दवडला जाणार नाहीं यासाठी डोळ्यांत तेल घालून सतत व अखंड झटलें पाहिजे. सत्कार्य, सदाचरण, नामचिंतन व परोपकार या गोष्टी आपल्या दृष्टीसमोर सतत असल्या पाहिजेत त्या आचरणांत आणण्याकडे सतत झटले पाहिजे.

खरोखर आपल्या गाठीशीं पुण्यांश होता व म्हणूनच हा नरदेह प्राप्त झाला याची जाणीव बाळगून या जीवनांतील एकही क्षण कोणतेंही दुष्कृत्य करण्यासाठ खर्च केला जाणार नाहीं याबद्दल दक्षता बाळगणें हें आपलें परम पवित्र कर्तव्य आहे.

पाहूं या पुढें; सत्कार्यें करतां येतील पुढें. तूर्त येनकेन प्रकारेण आपला स्वार्थ तर साधून घेऊं या. अशी कित्येकांची वृत्ति असते. पुढें किंवा कोणत्याही क्षणीं काय होईल हें कोणींही सांगूं शकणार नाहीं. जी घटका मिळाली ती आपली. त्या घटकेचा जितका म्हणून सदुपयोग करतां येईल तितका आपण करून घेतला पाहिजे.

ईश्वरानें बरें वाईट, योग्य अयोग्य व पाप आणि पुण्य हें ओळखण्याची शक्ती फक्त मानव प्राण्यालाच दिलेली आहे. या शक्तीचा शक्य तेवढा सदुपयोग न करतां जर आपण दुरुपयोग केला तर देवानें हा जो जन्म दिला त्याचा काय बरे उपयोग!

सर्व प्राणिमात्रांत मानव हाच श्रेष्ठ आहे; परंतु तो जर का मानवधर्म सोडून निर्बुद्ध इतर प्राण्याप्रमाणें वागूं लागला तर त्या जन्मदात्यावरच पश्चात्ताप करण्याची पाळी यावयाची! तशी पाळी त्याच्यावर येऊं नये यासाठीं आपण झटावयाचें आहे. खरें सांगायचें म्हणजे नरदेहाची निर्मिती करून भगवंताला आपण कृतार्थ झाला असें वाटतें; परंतु तोच मनुष्य जर पशूप्रमाणें वागूं लागला तर त्याला काय बरें वाटेल!

जन्मदात्याच्या आपल्याकडून कांहीं अपेक्षा असतात. त्या आपण पूर्ण केल्या तरच या जन्माचें सार्थक. विचारानें वागणें, कोणत्याही बाबतींत अविचार न करणें, नेहमीं दुसऱ्यांच्या उपयोगी पडणें, स्वतःचा संसार उत्तम प्रकारें चालविणें, आपल्या सभोंवार आनंदीआनंद निर्माण करणें, हें प्रत्येक मानवाचें कर्तव्य आहे.

मनुष्य नराचा नारायण होऊं शकतो, तसे पशुपक्षी नाहींत. हा देह नाश पावणारा आहे; परंतु आपल्या कर्तबगारीच्या बळावर तो अविनाशी होऊं शकतो. अविनाशी होण्याचें नरदेह हें एक साधन आहे. तें साधन आपण कशा रीतीनें वापरतों यावर सर्व कांहीं अवलंबून आहे.

मनुष्याला नराचा नारायण होण्यासाठीं ज्या ज्या गोष्टी लागतात, त्या त्याला उपलब्ध असतात; परंतु त्या त्यानें अंमलांत आणल्या पाहिजेत.

आम्हीं सर्व माणसें नेहमीं चूक करतों ती याच बाबतींत. आम्हांला आमचें कल्याण कशांत आहे हें समजलें पाहिजे. जें कल्याणाचें असेल तेंच आपण आचरणांत आणण्यासाठीं सतत झटलें पाहिजे. उदाहरणार्थ उठतां बसतां देवाचें नामस्मरण करणें हें किती जणांकडून आचरिले जाते? अशा अनेक गोष्टी आहेत कीं, ज्यांची जाणीव आपणास असते. हें सत्कार्य आणि हें दुष्कार्य इतकें समजण्याची बुद्धि किंवा ज्ञान माणसांत असते. नाहीं असें नाहीं, परंतु आचरण किंवा मनाचा ओढा सत्कृत्यापेक्षां वाईट व घातक कृत्यांकडेच असतो. सारासार दृष्टीनें हें आपण टाळलें पाहिजे.

बाबानीं सांगितलें आहे कीं, 'विनाशी नर करितां साधन। होईल अविनाशी नारायण। नरदेहासमान साधनसंपन्न। दुजा न आन ये सृष्टीं॥'

ईश्वरानें हा जो देह दिला, ज्ञान दिलें, सर्व कांहीं दिलें तें कशासाठीं हा विचार आपल्या मनांत सतत वावरत राहिला पाहिजे. मनाने त्याचा ध्यास घेतला पाहिजे. जन्मदात्याचा हेतू ओळखून त्याप्रमाणें जो वागेल त्यानेंच या नरदेहाचें सार्थक केलें असें म्हणतां येईल. ज्यानें हेतू ओळखला तो सतत त्या भगवंताचें नामस्मरण करील, आपल्या हातून त्या नामाला साजेसें पुण्यकार्य घडावें म्हणून डोळ्यांत तेल घालून जपत राहील.

हा भगवंताचा खेळ आहे. हा त्यानें आपल्यापुढें टाकलेला डाव आहे. तो आपण योग्य मार्गानें जाऊन यशस्वीरीतीनें खेळला पाहिजे. जन्मभर कष्ट करायचे, स्वार्थ तेवढा साधण्यासाठीं आणि स्वतःचें नि कुटुंबाचें पोषण करण्यासाठीं झटावयाचें हीच आपली इतिकर्तव्यता? स्वतःचें शरीर पोषण व ज्या कुटुंबांत आपण जन्म घेतला व ज्यांच्याशीं संबंध जडला त्यांचें परिपालन एवढ्यासाठीं देवानें हा जन्म दिलेला नाहीं. याशिवाय आपण करावें असें कांहीं ना कांहीं आहे तें आपण सत्संगतीनें, गुरुमाऊलीच्या कृपेनें व उत्तम ग्रंथांच्या वाचनानें जाणलें पाहिजे.

आपण श्रद्धेचें पाठबळ, मिळविलें पाहिजे. तिच्या सहाय्यानें ज्ञान, वैराग्य संपादन केलें पाहिजे. मी कोण आणि माझें कर्तव्य कोणतें याचा विचार केला पाहिजे.

आपण स्वस्वरूपाचें ज्ञान करून घेतलें पाहिजे व त्यासाठीं जें जें करावें लागेल तें समजून उमजून केलें पाहिजे.

मनुष्यालाच नारायण पदाची प्राप्ती करून घेतां येते हें आरंभींच सांगितलें, चारी पुरुषार्थ कोणते ते समजून घेऊन ते साध्य करण्यासाठीं आपण झटलें पाहिजे. त्याचा अभ्यास, निदिध्यास सतत घेतला पाहिजे आणि हें जें साधन करायचें तें मनुष्यदेहालाच शक्य आहे.

हा देह कधीं कोसळून पडेल हें सांगतां येणार नाहीं. या देहांत जोंवर प्राण आहे, जोंवर हालचाल करतां येत आहे तोंवर आपण साधून घेतलें पाहिजे. नाहीं तर मनुष्य जन्माचें भाग्य लाभलें आणि त्याचा उपयोग मानवधर्माचें पालन करण्यांत न घालवितां जर आपण निर्बुद्ध पशूप्रमाणें वर्तन करण्यांत केला तर त्याचा काय बरें उपयोग ?

आणि शेवटीं बाबांनीं हेंच सांगितलें आहे कीं,—

'म्हणूनि झालें न जों शरीर पतन । आत्मज्ञानार्थ करा यत्न ।
नरजन्माचा एकही क्षण । उपेक्षून टाकूं नका ॥'

आमच्यापैकीं प्रत्येकानें बाबांची ही मोलाची शिकवण आत्मसात करण्यासाठीं झटावयाचें आहे. त्यांतच आपला उद्धार आहे.

—संपादक



# देवानें संकटमुक्त केलें

## संत विसोबावरील प्रसंग

पंढरपुरक्षेत्रांत कोणी विसोबा सराफ नांवाचा एक गृहस्थ राहत असे. तो सावकार असून देवघेवीचा धंदा करीत असे. त्याची बायको मोठी पतिव्रता असून नेहमीं आपल्या पतीच्या अर्ध्या वचनांत असे त्याला चार मुलगे होते.

विसोबा, बायको व पुत्र यांनीं संपन्न असून प्रपंच करीत होता तरी तो मोठा विरक्त असे. तो पाण्डुरंगाचा प्रेमळ भक्त होता. कसलाही कठीण प्रसंग गुदरला तरी विसोबा कधींही असत्य वाणीचा उच्चार करीत नसे. तो औदार्यशील असल्यामुळें कोणीही क्षुधित मनुष्य त्याच्या घरांतून विन्मुख होऊन जात नसे. दुष्काळाच्या दिवसांत पोटार्थी माणसांची विसोबाच्या घरांत गर्दी जमे. कोणालाही निराश करावयाचें नाहीं, असा त्याचा बाणा असल्यानें दानधर्म करण्यानें त्याची फार ओढ झाली. पण दात्याच्या स्थितीचा विचार याचकजन मनांत कशाला आणतील ? मातेच्या स्तनांतील दुग्ध सरून तिचा देह ताणूं लागला तरी लहान मूल स्तनाला झगडतच असतें. त्याप्रमाणें औदार्यगुणयुक्त दाता हीन स्थितीस पोंचला तरी याचक लोक त्याचा अंत पहातच राहतात. आपली स्थिति खालावली तरी आपल्या घरांत अन्नाकरितां प्राप्त झालेल्या अन्नार्थ्यांचें आत्मे तृप्त करण्याकरितां विसोबानें आपल्या घरांतील सर्व चीजवस्तूही विकली. उदारपणाच्या परमावधीनें विसोबाच्या हातांत करटी आली. प्रापंचिक लोक त्याची निंदा करूं लागले. पैका सांठवून ठेवलेले लोक त्याला हीन मानूं लागले. कोणी कोणी त्याला मूर्ख लेखूं लागले. जनतेच्या बोलण्यास कवडीचीही किंमत न देतां तो मेघतुल्य उदार विसोबा संसाराची चिंता व देहाची आस्था सोडून हरिभजनांत रममाण होऊन बसला.

विसोबाच्या जवळची सर्व चीजवस्तू संपून तो कफल्लक बनला. तेव्हां त्यानें कासेगांवच्या पठाणाजवळून कर्ज काढून याचकवृत्ती करण्याचें आरंभिलें. वरचेवर काढलेल्या कर्जाची रक्कम सातशेंपर्यंत वाढली तेव्हां त्यानें दुहोतऱ्याचें व्याज पतकरून त्या पठाणाला रोखा लिहून दिला.

विसोबा कर्जबाजारी होऊन बसल्यानंतर कोणी रामपुरीबुवा नांवाचा एक सिद्धपुरुष विसोबाचें सत्व पाहण्याकरितां पंढरपुरांत आला. विसोबाच्या अंगीं समविषमभाव आहे कीं, त्याच्या अंतःकरणांत सर्वांविषयीं सारखीच दया वात्सल्य

करीत आहे हें पाहण्याचा त्या सिद्धपुरुषानें आपल्याशीं बेत ठरविला. त्यानें मोरींतला दुर्गंधियुक्त चिखल आपल्या अंगास फासला. कमरेला चिंध्याचा एक करगोटा बांधला. अमंगल अशी एक लंगोटी परिधान केली; हातामध्यें एक खापर धारण केलें, आणि अशा कुश्चळ वेषानें तो सिद्धपुरुष प्रहर रात्रीच्या सुमारास विसोबाच्या घरीं गेला. त्यानें वेड्याप्रमाणें विसोबास हाक मारून आपणास भूक लागली असल्याचें कळविलें. त्याची हाक ऐकतांच विसोबा बाहेर आला. त्यानें त्यास ओळखलें नाहीं; तरीही त्यानें त्यास सन्मानपूर्वक थांबवून जेवावयास राहविलें. तो पुरुष अन्नपात्रावर बसला आणि विसोबा त्याच्या समोर बसला. त्याच्या अंगाचा दुर्गंध सुटला होता. तेव्हां विसोबानें पात्र वाढण्याचें थांबवून उष्ण उदकानें त्याला आपल्या हातांनीं स्नान घातलें. त्याचें अंग स्वच्छ व कोरडें करून त्यानें त्याला कौपीन नेसविली. त्याच्या गळ्यांत तुळसीमाळा घालून त्याला गंध, अक्षता वाहिल्या. नंतर त्यास भोजन घालून विसोबानें त्याच्या पायावर डोकें ठेविलें. त्यानंतर मुखशुद्धीकरितां तुळसीदळ देऊन विसोबानें त्या महापुरुषाची रवानगी केली.

वाघ, गाय, आणि विंचू यांच्याविषयीं समानभाव राखणारा प्राणी क्वचित्च सांपडेल; राजा आणि रंक यांना सारखाच सन्मान देणारा; अनाथ याचक आणि विद्वान् ब्राह्मण यांची एकाच भावानें सेवा करणारा जो कोणी विसोबासारिखा महात्मा असेल, त्याच्या घरीं पांडुरंगाचें वास्तव्य असावयाचेंच. अशी कल्पना मनांत आणून त्या सिद्ध पुरुषानें विसोबाची वृत्ति जाणली आणि त्याच्या मनावर आत्मज्ञानाचा ठसा उमटला आहे याबद्दल आनंद मानून तो सिद्ध पुरुष स्वाश्रमांत निघून गेला.

हा प्रकार झाल्यानंतर कोणी दुर्जनानें कासेगांवच्या पठाणास विसोबानें दिवाळे काढून काखा वर केल्या असल्याचें वर्तमान कळविलें. त्यावरून तो पठाण पंढरपुरास येऊन विसोबाजवळ आपले पैसे मागूं लागला. देण्याचा तगादा लागतांच विसोबा मोठ्या चिंतेत पडला. तसेंच धैर्य धरून त्यानें त्या पठाणाजवळ कर्ज फेडण्याबद्दल सात दिवसांचा वायदा केला. विसोबाच्या बोलण्याचा भरंवसा वाटून पठाणानें त्या वायद्यास चार साक्षीदार ठेवून तो तेथून चालता झाला.

सहा दिवस कसे तरी रेटल्यावर सातव्या दिवशी विसोबा विवंचना करीत बसला. सावकार आपली वाट पाहील म्हणून विसोबा मानसिक चिंतेनें व्याकूळ झाला. आपण आजन्म असत्य बोललों नाहीं, पण आतां जाब खोटा होणार याबद्दल तो अतिशय व्यथित झाला. तसाच तो देवपूजेला बसला पण त्याला पूजा सुचेना. त्याला पठाणाचें ध्यान लागलें.

विसोबाचें संकट जाणून विठोबांनीं त्याच्या जुन्या गुमास्त्याचें सोंग घेऊन कासेगांवास गमन केलें. पठाणाची गांठ घेऊन त्यांनीं त्यास सांगितलें, "मी

बाचा गुमास्ता आहे. विसोबा केव्हांही असत्याचा उच्चारच करीत नाहींत. आपला हिशेब काढून बाकी पूज्य करून घ्या." असें सांगून त्यांनीं चार साक्षीदारांसमक्ष सातशें रुपये व्याजासुद्धां पठाणाच्या पदरांत टाकून विसोबाच्या नांवाचा खा परत घेतला. नंतर पंढरपुरांत येऊन पांडुरंगानें तो रोखा वरच्या बाजूस थोडासा फाडिला आणि विसोबाच्या गीतेंत घालून ठेविला.

विसोबानें गीतेची पोथी सोडली तेव्हां तींत तो भरपाई केलेला रोखा पाहून त्यास विस्मय वाटला. पठाणाचें ऋण फेडिलें नसतां रोखा घरांत सा आला याबद्दल त्यानें आपल्या मुलांना व बायकोला विचारलें. त्यांना त्याची कांहींच माहिती नाहीं असें समजतांच त्यानें तें खत ज्याचें त्यास देण्याच्या संकल्पानें कासेगांवी प्रयाण केलें. पठाणाची व त्याची गांठ बाजारांत पडली. पठाणानें त्यास त्याच्या गुमास्त्याचा वृत्तांत सांगितला. गुमास्त्याबद्दलची सर्व माहिती विसोबा नाकबूल करूं लागला तेव्हां त्याची खात्री पटविण्याकरितां पठाणानें चारी साक्षीदार बोलावून आणिले. त्यांनींही तोच मजकूर सांगितला. नंतर आश्चर्य पावून विसोबा पंढपूरपुरास आला. त्यानें आपल्या जुन्या गुमास्त्याजवळ शोध केला. त्यानें पांडुरंगाच्या शपथेवर आपणास कांहींएक ठाऊक नसल्याचें सांगितलें. तेव्हां विसोबाला हरिलीलेची खूण पटली. त्याचे डोळे अश्रुपूर्ण होऊन त्याने विठ्ठलचरणास मिठी मारिली. पांडुरंगांनी भक्ताला हृदयाशीं धरिलें. पांडुरंगानें भक्ताचें संकट वारल्याचा पुकारा होऊन सर्व क्षेत्रभर विसोबासारखा भक्त आणि भक्तकाजकैवारी पांडुरंग यांचा जयघोष झाला.

भक्तजनांना संकट प्राप्त झालें असतां दीनदयाळ परमात्मा काळवेळ न पाहतां संकट निवारणार्थ उडी घालतो हा अबाधित सिद्धांत आहे. कृत, त्रेत, द्वापार या युगांमध्यें भक्तांच्या संरक्षणार्थ परमेश्वरानें प्रत्यक्ष अवतार घेतले ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. कलियुगांत परमात्मा बौद्धरूपी बनला असला तरीही परमेश्वरी साक्षात्काराची असंख्य उदाहरणें घडून येतात इकडे आमच्या लोकांनीं बारकाईनें लक्ष दिलें पाहिजे. कलियुगामध्यें परमात्मा पाषाणस्वरूप झाला असला तरी चारीयुगांत या कलीमधील भक्तीच तत्काल श्रेयस्कर व फलद्रूप होणारी आहे असें जें श्रीशुकांनीं सांगितलें आहे तें अक्षरशः खरें आहे. आमचे लोक फाजील शहाणे झाले असल्याकारणानें विकल्पजालांत अडकून पडत आहेत. ज्यांच्या अंतःकरणांत विकल्पानें ठाणें दिलें त्यांना परमात्मा केव्हांही पावणार नाहीं, ज्यांच्यावर अहंभावाचा दाब बसला असेल; ज्यांना स्वतःच्या कर्तृत्वशक्तीचा ताठा भरला असेल; ज्यांना विषयसौख्यापलीकडे कांहींच दिसत नसेल; जे नाशवंत सौख्याच्या भरांत परमेश्वरास जुमानीत नसतील त्यांना परमेश्वरही जुमानणार नाहीं. स्वैरगतीनें वागण्याची लालसा धरून आपल्या

आरामांत जरा कमीपणा आला कीं, परमेश्वराच्या नांवानें खडे फोडणाऱ्या लोकांकडे परमेश्वर ढुंकूनही पाहणार नाहीं. परमेश्वराच्या अंगांतील समतेच्या फायद्याची आशा धरून अनाचारात प्रवृत्त होणाऱ्या लोकांविषयी मात्र परमात्मा समता राखणार नाहीं तो निर्गुण, निर्विकार असला तरी त्याचें अव्यक्त स्वरूपच कारणपरत्वें सगुणरूप धारण करतें ही गोष्ट चांगली ध्यानांत राखली पाहिजे. सगुण व निर्गुण अशी एकाच परमेश्वराची अंगें असल्याकारणानें ज्याची त्याची भावनाच ज्याला त्याला फळते हा मुख्य मुद्दा आहे. ज्यांनीं शुद्धभाव धरून परमेश्वराच्या नामास कंठांत धारण केलें असेल, परमात्म्याच्या अनुज्ञेप्रमाणें ज्यांनीं सत्य, शांति, दया, शुद्धआचार आणि विहित धर्म यांचा अवलंब केला असेल त्यांच्यावर कसलींही संकटें कोसळलीं तरी आपल्या ध्येयमूर्तींच्या कृपेनें त्यांचें अखेर तारण होईल याबद्दल सर्वत्रांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधावी. कोणत्याही तऱ्हेचा विपत्काळ प्राप्त झाला, कसल्याही प्रकारच्या आधिव्याधि उद्भवल्या तरी सद्गुणापासून न ढळतां एका ईश्वराच्या भजनांत अचल राहिल्यानें इहपरलोकीं कल्याण होणार आहे हेंच या भक्तविजयापासून मुख्यतः शिकावयाचें आहे.

—:०:—


# गद्यरूप श्रीदासबोध सार

लेखक : डॉ. व. सी. कानविंदे

दासबोधाच्या अभ्यासकांकरितां अत्यंत उपयुक्त पुस्तक.

किंमत फक्त रु. ३-५०. ट. ख. निराळा. पृष्ठें १८२

मिळण्याचें ठिकाण:—

ग्रंथायन मराठी पुस्तक विक्रेते,

ए ११ गुडविल बिल्डिंग, माहीम-मुंबई १६


# ‘मर्जी देवाची, मिथ्या धाव मनाची’

मनुष्यमाच्या जीविताचा व्यक्तिशः विचार केला असतां आपणाला असें दिसून येतें कीं, अल्पायुषी होणें हा सर्वसाधारण नियम असून दीर्घायुषी होणें हा वळ अपवाद आहे. आपल्या देशीं प्राचीन काळापासून लहान माणसें मोठ्यांना मस्कार करूं लागलीं म्हणजे ‘शतायु भव’ किंवा ‘आयुष्यमान् भव’ असा ाशिर्वाद देण्याची जी चाल पडलेली आहे तीवरूनहि पुष्कळ वर्षें किंवा शंभर वर्षें गणें ही नेहमीं घडणारी गोष्ट नसावी असें वाटतें. एका इंग्रज कवीनें मनुष्याच्या ीवितार्चे साधारण मान सत्तर वर्षें असल्याचें लिहून ठेविलें आहे. ह्या सत्तर वर्षांत तेक मनुष्य ह्या जगरूपी रंगभूमीवर आपल्या जीवितनाटकामध्यें सात वेगवेगळ्या ूमिका घेऊन अंतर्धान पावतो. आपल्या देशांत शंभर वर्षें जमणारीं माणसें म्हणजे दार्थसंग्रहालयामध्यें दुर्मिळ म्हणून ठेवल्या जाणाऱ्या वस्तूंइतकीं दुर्मिळ आहेत सत्तर र्षें जगणारीं जरी दुर्मिळ नाहींत, तरी विपुलहि नाहींत. साधारणपणें शाळेंतील वेद्याभ्यास संपतो न संपतो तों मुलांच्या केसांत पांढरेपणाची लकाकी मारूं लागते; नुष्य चाळीस वर्षांचा होतो तों डोकें पांढरें होतें; पेन्शन घेऊन फार वर्षें उपभोगण्याचे ारच थोड्यांच्या नशिबीं असतें. अशी आमच्या देशांतील माणसांच्या जीविताची स्थिति आहे. आयुर्मर्यादा अल्प असते ही गोष्ट जरी खरी आहे तरी अप्रबुद्ध मनुष्यें ना करितां आपण सर्वजण आपल्या आयुष्यामध्यें काय काय करणार, ह्या विषयाचें चित्र रेखाटून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करितों, व हें चित्र बहुतकरून आपण ुष्कळ वर्षें जगणार असें गृहित धरूनच रेखाटलेलें असतें. पण ह्या बाबतींत अनुभव ात्र वेगळाच येतो. कित्येक वेळां आपल्या मनाचे बेत ढांसळले जातात व ते ेवटास जाण्याचें एकीकडेच राहून आपल्याला जीवितालाच मुकावें लागतें. कित्येक ेळां आमचे बेत जागच्या जागीं रहातात व त्यांच्या ऐवजीं परमेश्वर दुसरीच योजना रून पार पडतो. आपण पुष्कळ योजना करतों, वेगवेगळ्या आकांक्षा मनांत धरून ा शेवटास नेण्याचा प्रयत्न करितों, आमच्या मोठमोठ्या उड्या असतात. परंतु आमच्या संबंधानें देवाची योजना वेगळीच असते. “मर्जी देवाची, मिथ्यर धांव नाची” असा जो आपल्यालों ह्या बेतांसंबंधीं अनुभव येतो ह्याचें कारण काय ? जर प्रेममय आहे, न्यायी आहे तर त्यानें आम्हांला अल्पायुषी करून किंवा अन्य कारें आमचे बेत ढांसळून टाकावे ह्याचा अर्थ काय ? उड्या जर आपलपोटेपणाच्या असतील तर शेवटास जाऊं न देणें ही परमेश्वराची कृपा न्याय्य होईल. परंतु मनुष्य

जेव्हां देवाचेंच कार्य करण्याला उद्युक्त झालेला असतो, अशा वेळीं सुद्धां त्याच्या जीविताचा एकाएकीं अंत करणें हें रास्त आहे काय? देशसेवा, जनसेवा, देवाचें व धर्माचें कार्य करणारीं माणसें. लहान वयांत मृत्युमुखीं पाडण्यामध्यें परमेश्वराचा न्यायीपणा कोठें दिसतो?

ह्या प्रश्नाचा वरवर विचार करणाऱ्याला परमेश्वर अन्यायी, दुष्ट व विघ्नसंतोषी आहे, असें वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु ह्याचा विचार करण्याचा दुसरा एक मार्ग आहे. अल्पायुष्यत्व पाहून आपल्याला दुःख होतें ह्याचें कारण पुष्कळ वर्षें जगल्यानें जीविताची सफलता होते, हा आपला समज हें होय. मनुष्याचें जीवित यशस्वी होणें किंवा व्यर्थ जाणें हें त्याच्या दीर्घत्वावर अवलंबून नसतें. एखादा मनुष्य पुष्कळ वर्षें जगूनहि त्याच्या हातून एखाद्या लहान मुलाच्या हातून होणाऱ्या कृतीचा पाव हिस्साहि कार्य होणार नाहीं. अशा मनुष्याचा जन्म सार्थ झाला असें आपल्याला म्हणतां येईल काय? नाहीं. जें कांहीं आयुष्य परमेश्वरानें दिलें, तितक्यामध्यें शक्य तितकें त्याचें कार्य आपल्या हातून झालें असतांहि तें सार्थ झालें असेंच समजलें पाहिजे.

परमेश्वराच्या कार्याला वाहिलेलीं मनुष्यें अल्पायुषी झालीं असतां त्यांचें कार्य अधिक उत्साहानें व जोमानें करणारीं दुसरीं पुष्कळ मनुष्यें उत्पन्न होतात. ह्या दृष्टीनें अल्पायुषी मनुष्याच्या चरित्राकडे पाहिलें असतां, देव अन्यायी नाहीं, ह्याविषयीं आपली खात्री होईल. अशा माणसांचा अंत झालेला पाहून दुसऱ्यांना त्यांचें कार्य पुढें चालविण्याचा उत्शाह येतो व ह्या न्यायानेंच देवाच्या कार्याची वाढ होत असते. ह्याच दृष्टीनें 'The blood of the martyr is the seed of the Church!' ही म्हण खरी ठरते.



# सर्वांभूतीं समभाव

श्री दासगणूमहाराज हे श्रीसाईबाबांचे एक परमभक्त होते. त्यांची गणना
संत पुरुषांत करणेंच योग्य. श्री. अनंतराव आठवले लिखित त्यांच्या चरित्रांतून
खालील उतारा घेण्यांत आला आहे. त्यावरून ते किती थोर योग्यतेचे होते याची
सहज कल्पना करतां येईल. श्री दासगणूमहाराज यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक उज्ज्वल
पैलू आहेत. उत्कृष्ट हरिदास, सदाचरणी पुरुष, आतिथ्यशील सद्गृहस्थ, समाजाच्या
सर्वांगीण अभ्युदयाची तळमळ बाळगणारा संत, प्रतिभासंपन्न महाकवि, तत्त्वज्ञ,
विवेकशील गुरु, जिवलग स्नेही आणि प्रेमळ वत्सल पालक अशीं विविध निर्मल
रूपें त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचीं आहेत. त्यांच्या सहवासांत जन्मापासूनचीं
३३-३४ वर्षे सतत घालविलेल्या माझ्यासारख्यासहि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें ज्ञान
संपूर्ण झालें आहे, असें मी म्हणूं शकत नाहीं. इतकी गंभीरता त्यांच्या खेळकर वाट-
णाऱ्या जीवनांतहि आहे. त्यांच्या मुद्रेवर दिसणारी कारुण्याची नाजुक छटा असलेलें
गांभीर्य जें छायाचित्रांतूनहि प्रत्ययास येतें, त्यावरून त्यांच्या अंतःकरणाची थोडीशी
कल्पना येऊं शकते. करीत असलेली प्रत्येक गोष्ट त्यांनीं आपल्यापुरता पूर्ण विचार
करून ठामपणें ठरविलेली असे. आणि त्यामुळें विवेकशील श्रद्धेबरोबरच निग्रही
धार्मिकताहि त्यांच्या वागण्यामध्ये आढळून येते.

चटकन् निर्णय घेऊन मोठमोठे वादविवादहि कसे थांबवावेत, हें खरोखरीच
श्रीदासगणू महाराजांच्याजवळच शिकावें असें मी म्हणेन. मला स्वतःलाच त्याचा
अनेक वेळीं अनुभव आला आहे. त्यांतील एक प्रसंग सांगतों.

वऱ्हाडांतील शेगांवचे राहणारे श्री. नामदेव बापूजी काळे हे गृहस्थ निष्ठावंत
वारकरी व फार अभ्यासू असे आहेत. संतवाङ्मयाचा त्यांचा व्यासंग फार दांडगा
आहे. त्यांच्या या अभ्यासामुळें त्यांना महाराज श्रीनामदेवशास्त्री असें म्हणत. या
गृहस्थांशीं ज्ञानोत्तर भक्ति, पंचम पुरुषार्थाची भक्ति, या विषयांवर माझा मोठा
वादविवाद झाला. पुढें पत्रव्यवहारांतूनहि जवळ जवळ एक वर्षपर्यंत आम्ही कडाडून
वादयुद्ध करीत होतों. आम्हांपैकीं कोणीहि आपला आग्रह सोडीना आणि निर्णयास
येईना. नागझरीमहात्म्याच्या प्रस्तावनेंतून श्री. काळे यांनीं आणि भक्तिरसायन
वप्रकाशिकेच्या प्रस्तावनेंतून मी अशीं आपापलीं मतें आग्रहीपणानें प्रसिद्धहि केलीं.
नंतर ती. दादा ( दासगणूमहाराज ) मला एकदां म्हणाले, "तुझ्या मताप्रमाणेंच
श्री. काळ्यांशीं वाद करूं शकत नाहीस. श्री. काळे मात्र तुझ्याशीं करूं शकतात.

तुला त्यांचें म्हणणें गप्प बसून शांतपणानेंच ऐकलें पाहिजे. 'श्रीसंतांना जगाचें कल्याण साधण्यासाठीं भक्तीची ख्याति रूढवावयाची होती, पार पावलेल्यानें नाव जाळूं नये वा वैद्याअंगीं रोग नसला तरी त्यानें जगावर उपकार करण्यासाठीं औषधी संग्रहीं ठेवाव्या, या न्यायानें संतांनीं उपकारापुरते उरून स्वार्थनिरपेक्ष भक्तीचा डांगोरा पिटला. त्या भरांत कांहीं आग्रही वचनें साधकाची श्रद्धा दृढ होण्यासाठीं उच्चारिलीं,' असें तूं मानतोस ना ? मग साधकाची श्रद्धा दृढ होण्याच्या दृष्टीनें भक्तीची श्रेष्ठता ही निरपवाद आहे, हें आग्रहानें सिद्ध करणाऱ्या श्री. काळ्यांशीं तुझा वाद कां ? श्रद्धा दृढ होण्यासाठींच आग्रही बोलण्याचें प्रयोजन आहे, हें मान्य केल्यानंतर आणि तें तसें आवश्यकहि आहे असा निश्चय असल्यानंतर त्यांच्या आग्रही बोलण्यांतील विसंगति तर्कदृष्ट्या प्रगट करण्याच्या प्रयत्नांत तूं साधकाची भक्तिविषयक श्रद्धाच डळमळविणार आणि संतांच्या जीवन हेतूशी विरोध पत्करणार. तें करावयाचें नसलें, संतांच्या श्रद्धा असली तर तुझें म्हणणें खरें असूनहि तुला गप्प बसलें पाहिजे." हें ऐकून मी निरुत्तर झालों आणि श्री. काळे यांनीं ज्ञानोत्तर प्रेमलक्षणा भक्तीविषयीं एक मोठा ग्रंथ प्रसिद्ध केल्यानंतरहि त्यावर कोणतीहि टीका न करतां शांत राहिलों.

पंढरपुरास आले असतांना एक दिवस भारताचार्य चिं. वि. वैद्य तेथील बडवे आणि क्षेत्रोपाध्ये यांच्या वर्तनाचा उबग येऊन श्रीमहाराजांना म्हणाले, "बोवा, इतरांचें ठीक आहे, पण तुमच्यासारख्याला हें सगळें वातावरण कसें सहन होतें ? काय वागणें या लोकांचें !

"हें पहा चिंतामणराव, पांडुरंग हा सगळ्या जगताची आई आहे. तुमच्यासारखीं चांगलीं मुलें त्यानें स्वतंत्रपणें वापरण्यास मोकळी ठेविलीं. बडव्यांसारखीं नाठाळ मुलें तेवढी आपल्याजवळ ठेवून घेतली. जवळ येणाऱ्याच्या श्रद्धेची परीक्षा पाहण्याची ही कसोटी का समजत नाहीं ? आपल्या संस्कृतींत पिंडाला काकस्पर्श झाल्यावांचून सद्गति नाहीं, असें मानतात. हे सगळे कावळे अनायासें आपल्या या पिंडाला शिवताहेत. बरें झालें ! त्यांचा राग करून काय उपयोग ?"

श्री. चिंतामणराव हंसून म्हणाले, "खरें आहे."

मनुष्य पाहून त्याला पटेल, विपरीत कल्पना नष्ट होतील आणि हितकर साधनावरील श्रद्धा वाढेल असें बोलणें महाराजांचें नेहमींच असे. त्यांच्या समन्वयवादी तत्त्वज्ञानाचा त्यांचें भाषण हा स्वाभाविक परिपाक आहे. त्यांच्या वागण्यांतहि प्रत्येक वेळीं हें प्रत्ययास येतें. श्रीतुकोबांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं ते एखाद्या मराठा वारकऱ्याची पूजा करतात. ज्ञानेश्वर महाराजांच्या उत्सवांत यजुर्वेदी ब्राह्मणाचा सत्कार केला जातो. सावतेबोवा व नामदेव यांच्या स्मरणदिनीं एखाद्या माळ्याचा

आणि शिष्याचा सन्मान होतो आणि हें सर्व मनापासून निष्ठेनें व सारख्याच आदरानें होत असें स्वतःच्या गुरूच्या पुण्यतिथीच्या दिवशीं ज्या आदरानें ते एकाद्या विद्वान् शास्त्रीबोवांची पूजा करितात तीच भावना प्रत्येक वेळीं त्यांच्या ठिकाणीं असते. हें वैशिष्ट्य खरोखरीच अनुकरणीय आहे. जाति असाव्या, जातिसंकर होऊ नये; असें ठाम मत असून हि परस्परहित वर्तन कसें असूं शकतें व होऊं शकतें तें महाराजांच्या जीवनामध्यें उत्तम प्रकारें अनुभवास येतें आणि म्हणूनच सर्व प्रकारच्या जातींतील व्यक्तींच्या अंतःकरणांतहि महाराजांच्याविषयीं एकमात्र आदराचीच भावना आहे. त्यांच्या आख्यानांतून वा काव्यांतून आलेल्या वर्णनामुळें पुष्कळ वेळां ते टीकात्मक असूनहि कोणालाहि तसा राग आलेला नाहीं. उलट पुष्कळ प्रसंगा आपल्या मनांतील भावनाच महाराज प्रगट करीत आहेत, असें लोकांना वाटे. निरपेक्ष आणि ईश्वर अंतःकरणाची ही कसोटीच मानली पाहिजे.

आजकाल राष्ट्राराष्ट्रांतील संबंधाच्या बाबतींत पंचशीलाचा मोठा गौरव केला जात आहे. तें आजच्या काळाच्या दृष्टीनें अपूर्व वाटत असले तरी भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकास त्यांत खरोखर नवीन असें कांहीं नाहीं. या संस्कृतीची घडणच मुळीं पंचशील तत्त्वज्ञानानें झालेली आहे. 'नांदा आणि नांदूं द्या,' 'जगा आणि जगूं द्या,' 'माना आणि मानूं द्या' हे सहजीवनाचे नियम हिंदू तत्त्वज्ञान्यांनीं कधींच आत्मसात् केलेले आहेत. त्यांचा आचार सुटला असल, पण तो व्यक्तींचा दोष आहे. तो नाहींसा करण्यासाठींच संत अवतीर्ण होतात आणि स्वतःच्या आचरणानें समाजाला परमार्थतः हितकर होणारें जीवन कसें जगावें, तें लोकांना शिकवितात. म्हणून केवळ परलोकाच्या दृष्टीनेंच नव्हे, अध्यात्माकरितांच नव्हे तर व्यवहारासाठींहि संतांचें फार महत्त्व आहे

श्रीदासगणू महाराजहि आपलें जीवन याच पद्धतीनें आणि याच हेतूनें घालवीत असत.



# लो. टिळकांचें पुण्यस्मरण

**************************

ता. १ ऑगस्ट हा लो. बा. गं. टिळक यांच्या पुण्यस्मरणाचा दिवस. ते देशभक्त होते तसेच ईश्वरभक्त व योग्याच्या योग्यतेस चढलेले महापुरुष होते. त्यांचें पुण्यस्मरण सदासर्वकाळ स्फूर्तिदायक व प्रेरणादायक होऊन रहाणारे आहे. त्यांच्या जीवनांतील दोन छोटे प्रसंग :—

## योगी टिळक

लोकमान्य टिळक द्वंद्वांतहि मनाची समता राखणारे योगी होते. टिळकांना वृद्धापकाळीं सहा वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली, तेव्हां सर्वांना फारच वाईट वाटलें. त्याकाळीं ही शिक्षा फार भयंकर समजली जात असे.

शिक्षा झाल्यावर टिळकांना दूर नेण्यासाठीं मोटार आली. मोटारीचा ड्रायव्हर एक कट्टर इंग्रज होता. तो टिळकांचा मनापासून द्वेष करीत असे. इतकी मोठी शिक्षा, द्वेषी इंग्रज ड्रायव्हर, परंतु झोंपायची वेळ होतांच टिळक मोटारींतच निश्चिंतपणे झोपी गेले.

त्यांची ती गाढ झोंप पाहून त्या द्वेष्टया इंग्रजानें देखील त्यांचा खूप गौरव केला आहे. टिळक असे योगयुक्त होते!

× × ×

## टिळकांची निर्भयता

लोकमान्यांची विद्वत्ता, नेतृत्व, चारित्र्य हे गुण प्रसिद्धच आहेत. परंतु त्यांचा निर्भयता हा विशेष गुण होता.

लोकमान्यांना सहा वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाल्यानंतर त्यांना मोटारींतून तुरुंगांत पोंचवण्यांत आलें. तुरुगांत पोंचवणारा एक इंग्रज सार्जंट होता. त्यानें टिळकांना विचारिलें—"तुम्हांला सोडून देण्यांत आल्यास तुम्ही काय कराल?"

टिळकांनीं उत्तर दिलें, "लोकांना सांगेन, इंग्रज हे आपले नंबर एकचे शत्रु आहेत. त्यांना इथून हाकलून लावा. राज्यकर्ते म्हणून ते शत्रु. एरवीं त्यांच्याशीं आमचें कांहीं वैर नाहीं."

# साधक आणि श्रीसाई

लेखक : श्री. प्र. श्री. जठार

साधकाची श्रद्धा हाच त्याला ईश्वरी साक्षात्कार! ज्या प्रमाणांत श्रद्धा तीव्र असते त्या प्रमाणांत त्याचें आत्मसुख मिळतें. इतकेंच नव्हे तर ईश्वरानेंच आपले सर्व संकल्प पुरविले व पुरवीत आहे ह्याची त्याला प्रचीती येते. श्रीसाईबाबा म्हणत, मला जो ज्या भावानें भजेल तसाच मी त्याला पावेन. ह्यासाठीं साधकाचा संपूर्ण भाव, संपूर्ण शरणागति बाबांच्या जवळ झाली पाहिजे.

हुशार माणसाला लवकरच कळून येते कीं, ह्या विश्वाचा पसारा व आपला मनुष्य जन्म विनाकारण नाहीं, त्याला कांहींतरी सबळ कारण आहे. इतकें एकदां पटलें कीं, तो आपल्या बुद्धीला चालना देतो. आतां जगातील प्रत्येक गोष्टीकडे तो संशोधकाच्या दृष्टीनें पहातो. हीच ती ज्ञानाची ओढ आणि हाच "ज्ञानयोग." ह्यांत सबुरी (शांतपणा, धैर्य) बेताचीच. उतावळपणा ह्यासाठीं हा योग फार कठीण आणि जर साधला नाहीं तर सर्व फुकट व मनस्ताप फार, कारण ज्ञानाला अंतपार नाहीं. ज्ञानाची सीमा अगाध आहे व जीवन क्षणभंगुर आहे.

साईबाबा एवढेच सांगतात, "श्रद्धा आणि सबुरी धर मी तुला देव, देव जो म्हणतात त्याची भेट करून देतो. तो देव मी तुझा करून देतो. "श्रद्धा" हीच भक्ति. श्रद्धेशिवाय भक्ति होणार नाहीं. साधक मनांत कोणत्यातरी देवतेला मानून त्याचीं भक्ति करीत असतो, म्हणजेच कोणतेतरी "मूल्य" मानीत असतो; हीच "श्रद्धा." बाबा म्हणतात, माझ्यावर "श्रद्धा" ठेव, तुझे काम होईल. श्रीसंत–तुकाराममहाराज म्हणतात, "देह जावो अथवा राहो, नामाचा गजर सोडूं नको." भगवान श्रीकृष्ण श्रीभगवद्‌गीतेंत म्हणतात, "पूर्ण श्रद्धा ठेवा, आणि श्रद्धेंत जर अविश्वास ठेवाल तर स्वतःचाच नाश करून घ्याल. तेंच गौतमबुद्धानें सांगितलें आणि तेंच जिझस ख्रिस्तानें आपल्या अनुयायांना सांगितलें. हजरत पैगंबराची गोष्ट सांगतात कीं, एकदां एक नास्तिक माणूस त्यांच्याकडे गेला व म्हणाला, मी अल्ला वगैरे मानत नाहीं व तुम्ही पण कांहींतरी थोतांड घेऊन बसला आहांत. तुमचा अल्ला अल्ला म्हणतात तो तर कुठेंच दिसत नाहीं; मग त्यावर मी विश्वास कसा ठेवावा. त्यावर महंमद पैगंबर हंसून म्हणाले, बरं. मला सांग, तूं ज्यावळेस सुलतान होतास त्यावेळीं तूं तुझ्या सामर्थ्यावर अवलंबून वैभव भोगत

होतास; मग त्यावेळीं तुला कधीं अल्लाची आठवण आली का ? आणि आतांच तूं अल्लाचा शोध करावयास निघालास आणि अल्लाची मेहरबानी कीं मलाच अल्लाची चौकशी करावयास आलास हें आश्चर्य नाहीं का. त्यावेळीं त्या सुलतानाच्या डोक्यांत प्रकाश पडला. हजरत पैगंबर पुढें म्हणाले, लढाईंत तुझ्या हाताला जखम झाली त्यावेळीं तूं कोणाला हाक मारलीस, त्याची तुझी ओळख होती का ? त्याला कुठें भेटला होतास का ? हें ऐकून त्या सुलतानानें तोबा तोबा करून दुःखानें तोंड बडवून घेतलें व हजरत पैगंबराचा शिष्य झाला.

श्रीसाईबाबा कर्मयोगाला फार मान देतात. ते म्हणतात, जी कांहीं इष्ट कर्मे असतील तीं तुम्ही करीतच रहा. मी दुधाची वाटी घेऊन तुमच्या मागें उभा आहे. कर्मत्याग हा कधींच होऊं शकत नाहीं. स्वासोच्छ्वास घेणें हें सुद्धां एक कर्म आहे; मग कर्मत्याग कसा होणार; पण कर्म कृष्णार्पण करणें हें तर अवघड नाहीं ना ?

अगदीं त्रिदंडी संन्यास घेतला व मन ताब्यांत नाहीं तर त्याचा काय उपयोग ? उलट श्रद्धा आणि सबुरीत सर्व योग अनायासे येतात. श्रीभगवत गीतेंतसुद्धां "भक्ती" योगाला महान् महत्त्व दिले आहे; कारण तो सोपा व त्यांत साधकाला सांभाळणारी एक अदृश्य शक्ती सतत वावरत असते. चिडीच्या पोराच्या पायाला दोरी बांधून ती असते. "जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती, हाती धरोनीया सांभाळीशी" आणि हीच ती साईभक्ति.


## "साई भक्तांस अमूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ (त्रैमासिक) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ (मासिक) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, (विशेष अंकासह) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे,) (दोन अंकास १५ पैसे,) (तीन अंकास २० पैसे,) (चार अंकास २५ पैसे.) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह (स्टँप-तिकिट) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

श्री साईलीला मासिक

# मानवी तेंच दैवी व तेंच मानवी

लेखक : श्री. अरविंद घोष
अनुवादक : श्री. ना. स. करंदीकर, बी. ए.

मानवी स्वभावाची एक उच्चतर स्थिति म्हणजे 'पूर्ण मानव, म्हणजे दैवी अंश.' हे सहसा आपल्याला दिसून येत नाहीं. आपल्या जीवनाचें परम ध्येय म्हणजे आपण या शरीरातील आहों हें जाणणें; शारीरिक अनुभूतीपलिकडे एक भव्य उदात्त स्वरूप आहे हें अनुभवणें. ह्या जगांत आपल्यापुढें एक महान् कार्य सोंपवलेलें आहे व तें म्हणजे वस्तूंच्या मुळाशीं खोल जाऊन तलास घेणें, आत्म्याच्या गूढ अस्तित्वाचें संशोधन करणें आणि मानवी जीवनांतील दिव्यत्वाची एकतारी छेडणें 'मानव' हा परमेश्वराची एक प्रतिछाया आहे, एक प्रतिबिंब आहे असे आपल्याला नेहमी सांगण्यात येतें. दैवी स्वरूप म्हणजे भगवान् सूर्यनारायण आणि प्रत्येक जीवात्मा हा त्याच्यांतून निघणारा एक तेजःपुंज किरण असें आपल्यास समजावण्यांत येतें. जगांतील प्रत्येक धर्मग्रंथांतून ह्या ना त्या स्वरूपांत याच प्रकारच्या भावनेची शिकवण दिलेली आढळते.

प्राप्त परिस्थितीशीं झुंज देऊन त्यांतून मार्ग काढून पलीकडे पोहोंचणें हें नेहमींच दुःखदायक असतें. जन्मतः दुःख, आणि मानवाच्या प्रगतीपथातही नव्या नव्या अनुभवाबरोबर जुन्या सवयींच्या गोष्टींची फारकत, त्यामुळें प्रगति ही देखील क्लेशदायक! तरी देखील जीवनाचें सूत्र म्हणजे 'विकास'—'सतत विकास.' पण हा विकास होतो कोणत्या दिशेनें? अनंततेच्या मार्गानें; अनंत्व मिळवून देणारा मार्ग आक्रमणें हेंच आपलें ध्येय, त्यासाठीं जीवनाची ही सारी धडपड. पोकळ भ्रामक डौल व वैभव हे कांहीं मानवी विचारांचा व अंतःकरणाला स्थिरता देऊं शकत नाहीत. त्या परमात्म्याच्या दिव्य चैतन्य स्वरूपी विशाल अस्तित्वाची जाणीव, अनुभूतीजन्य—ज्ञान व त्यामुळें होणारा परमानंद हेंच मर्यादित स्वरूपाच्या आपल्या स्तवन पूजनाचें अमर्याद सत्यस्वरूप; हीच परमावधी; हेंच अंति ध्येय.

खरोखर मानव हा कोणी एखादी चेतनाशक्ति नसून परमेश्वराच्या चैतन्याचेच स्वरूप आहे. त्याची सर्व उत्साहशक्ति ह्याच दिव्यत्वाकडे. परमात्म्याच्या अनंतत्वाची, श्रेष्ठत्वाची ओळख प्रत्येक वस्तूच्या हृदयांत. अंतरंगांत शिरून पाहण्यास शिकणें,

ह्यांतच मानवाचें मोठेपण आहे. म्हणून मानव म्हणजे शरीर नसून ' आत्मा ' आ
हें आपण ओळखायला हवें. ह्याच आत्म्याच्या स्वरूपांत तो अंतरात्मा-चैत्य पुरु
सतत भव्य आणि दिव्य जीवनाकडे प्रगत होत असतो; गोंधळलेल्या अवस्थेंतून मुक्त
करून घेत असतो; कारण गोंधळ होणें ही तत्वभ्रष्ट मनाची स्थिति. इंद्रिये ही नेहमी
अस्ताव्यस्त स्वरूपाची मानवी दृष्टि आंधळी करून सोडणारीं. आपण कोण आहो
काय आहोंत, आपल्यांत निहित शक्ति काय आहे, आपल्या जीवनाचे मध्यवर्ती स
काय, त्याच्या अंतरंगांतील गाभा कोणता, हें जाणून घेणें हेंच मानवी जीवनाचें अं
ध्येय. उत्तुंग शिखराकडे जाण्याची तीव्र इच्छा हीच आत्म्याची उन्नत अवस्था च
परिस्थिति कितीही उच्च असली तरी त्याही पलीकडे उच्च शिखरें आहेत; पु
सांगितल्याप्रमाणें कांहीं भव्य, दिव्य, कल्याणकारक उच्च दर्जाचें जीवन संगीत आ
याकडे आहे. आपली दृष्टि खिळावी ती खालच्या थरांतील छायेकडे, काळोखाक
अवनत स्थितीकडे नव्हे तर उत्तुंग चंद्रताऱ्यांकडे !

सूर्य हें ध्येय, तें साधण्याकडे आपण पराकाष्ठा केली पाहिजे. सूर्यनारायण-दि
त्याचा प्रतीक-मध्यवर्ती तळपणारा आध्यात्मिक सूर्य, ज्या सूर्यनारायणाच्या किरणां
सर्व दृश्य चित्तगोचर वस्तूवर पसरून प्रकाशमय केलें-सचेतनत्व आणलें त्याकडे ह

मानव हा श्रेष्ठ खराच; पण अनंतत्व व लोकोत्तर परात्पर मानवत्व व
आत्म्याच्या स्वरूपाचें चिंतन जास्त बहुमोल, त्याहूनही श्रेष्ठ हें दिव्यत्त्व आणि त्या
श्रेष्ठ-श्रेष्ठतम असा अखिल विश्वांचा सूत्रसंचालक परमेश्वर !

वेळेचें अंतिम रहस्य उकलन करणारा, आणि त्यापासून होणारे सर्व आ
यांचे दर्शन घडवून देणारा जो तेजःपुंज तारा त्यावर आपली दृष्टि रोखूं. ज्या अनं
त्वातून याची उत्पत्ति झाली त्या दिव्य अनंतत्वाला प्रणाम ! यावरून मानवी जीवना
कांहीं श्रेष्ठ भवितव्य आहे व त्याहीपेक्षां अंतिम दिव्यत्व असें उदात्त भवितव्य आहे
हें स्पष्ट झालें नाहीं काय ?

आपण आनंदानें बेहोन होऊन सुखी होऊं, ताऱ्यांकडे पाहून नाचूं; चंद्राक
पाहून म्हणूं, ' ही आमची भगिनी, ' सूर्याकडे पाहून म्हणूं, ' हा आमचा पिता
आम्ही यांच्याशिच चिरकाल एकरूपांत आहों असें आपणांस कळून येईल. विश्वातील
ही अशी विविध असंख्य चिन्हें, ही सर्व त्या प्रकाशमान परमेश्वराचीच परिवर्ति
किरणें आहेत. ' एकमेव तोच परमेश्वर आणि दुसरें कोणी नाहीं. ' ह्या अखि
विश्वांचा एकमेव परमात्मा तोच; म्हणून अद्वितीय, श्रेष्ठतम आत्मा तोच. या
अनंताचा आत्मा एकच आणि तोच या अनंतत्त्वांतून दृग्गोचर होणारा भगवान
दृग्गोचर होणारा आत्मा आणि ह्याच अवस्थेंतून अंतिम विलीन होणारा-दा
शाश्वत महाप्रलय !

परमेश्वर आणि मानव-दृग्गोचर होणारा ईश्वर आणि आत्म्याच्या विवि
प्रकारच्या दृग्गोचर होणाऱ्या अवस्था ह्या एक महान् परमेश्वराच्याच विविध स्वरू

पावस्था आहेत आणि त्यांतच सर्व सापेक्षता समाविष्ट आहे. त्यांत चतुर्वदन ब्रह्मदेव देखील विनाश पावतो. महारात्रींतून प्रवास करून महाप्रलयांत अंतर्धान पावतो. म्हणून आपण स्थलकालांतील अवकाशापलीकडे जाऊन पोहोंचू आणि अवकाशाची बंधनें तोडून वस्तूमात्रांच्या पोकळ गर्भांत विद्यमान असणाऱ्या देदीप्यमान परमेश्वराला हुडकून काढूं; वस्तूंचा प्रकाश–छाया जन्म–मृत्यू, उच्छ्वास–उर्ध्व आणि खाली, ह्या दोन्हीं अवस्थेंत असणाऱ्या महेश्वराला शोधूं. तोच एकमेव असा की ज्यांत ह्या दोन्हीं अवस्था स्थिरावतात. जो अनंतकालापासून होता, आहे आणि राहणार आहे, ह्या अखिल विश्वांचा एकमेव महान् आत्मा, एकमेव विशाल हृदयाचा, एकमेव ज्ञानमूर्ति असणाऱ्या परमेश्वराला वंदन. त्या परमात्म्याशिवाय कोण जगूं शकणार ! कारण सर्व चराचर सूक्ष्म–विशाल प्राणी मात्रांची चैतन्यशक्ति तोच. मानवाला तोच ईश्वर. मर्यादितांना तोच अनंतस्वरूप आणि आपल्या तर्कशक्तिपलीकडील मर्यादा पुरुषोत्तम तोच–मर्यादित असून अमर्याद. मर्यादित पण अनाकलनीय, अचिंत्य. मर्यादित पण सर्वांच्या मर्यादेचें एकमेव साकल्यानें एकत्र अनंतस्वरूप !

अहो, सूर्यनारायणाच्या गाभ्यांतील वैभवाप्रत आमचा कसा शिरकाव होणार ? तो प्रकाश भयंकरच देदीप्यमान ! कोण तो सहन करूं शकणार ? कोण म्हणतां ? पहा, तरी देखील प्राचीन ऋषीमहर्षींनीं त्या महाभयंकर तेजस्वी गोळ्याला परमेश्वरस्वरूप सूर्यनारायण कल्पून आह्वान केलें आणि ते उद्गारले, ' हे सूर्यनारायण, तूं अनंत, शुद्ध स्वरूप. तुझी सोनेरी तबकडी उकल आणि तुझ्या अंतरंगांत कोण आहे तें मला पाहूं दे, तुझ्या अंतरंगांतील सत्यस्वरूप मी ओळखले आहे; तुझ्या रक्तवर्ण किरणांचा आणि तुझ्या वैभवाचा गर्भित अर्थ मला विदीत झाला आहे. मला आतां पूर्ण कळून आलें आहे कीं तुझ्या अंतरंगांत वावरणारा ' तो ' ' तोच ' माझ्या अंतरंगांतही आहे. तूं आणि मी एकच. तूच माझ्यांत आहेस एवढे मला पक्के माहित आहे. तूं म्हणजेच मी, आणि मी म्हणजेच तूं.

' जीवन ' ही उत्क्रांती परंपरेतील श्रेणी आहे, अनंत समस्यांची उकलन आहे, मृत्यूंतून विकास होत होत पूर्ण परिणत अवस्थेंत पोंचणारी अवस्था आहे. एक गोळा बेरीज आहे, आत्मा आणि अनंतत्वाच्या विचाराचा साकल्येकरून होणारा परिपाक आहे. ह्याचा अंदाज कोण घेणार ? कोण ? अनेक शतकानंतर दैवी उत्क्रांतियाद तत्वप्रणालींतून–प्रवाहांतून एका क्षुद्र जंतूलाही शक्य हें होईल !

आमचा शोध तारांगणापलीकडे, चंद्रा–पलीकडे, सूर्यनारायणाच्याही पलीकडे. आमच्या शोधबुद्धीची छाया म्हणजे देदीप्यमान सूर्याचा केवळ प्रकाश ! आमच्या हृदयस्थ परमेश्वराच्या शोधासाठीं आमची तगमग. केव्हां केव्हां अधूनमधून आम्ही त्याला सगुण साकार, इंद्रियजन्य–नित्य शुद्ध–बुद्ध–स्वरूप शरीरी, कधीं सर्व चराचर-व्यापी, कधीं कधीं विशाल ज्ञानपूर्ण, विश्वचैतन्यशक्ति म्हणून संबोधूं. पण ही सर्व

स्वरूपें शेवटीं शद्बानींच केलेलीं वर्णनें नव्हेत काय ? आमच्याच आत्म्याची हीं नावे नाहींत काय ? हे 'आत्मा' स्वरूप अनंत नाहीं काय ? मग तें सर्वव्यापी नाहीं का ते मग नाहीं कोठें ? मग त्याच्या मर्यादा तरी काय ? हाच अतिश्रेष्ठ मानव आणि हाच अनंत दैवीपरमेश्वर–परमात्मा ? हेंच मानवाचें वैभव सूर्य– चंद्र तोच मानवाचें अखिल जग तेच. हे कालदेवते, तुझी दैदीप्यमान तेजद्वारें उघड आणि अवकाश देवते, तुझी अनंत गंभीरता टाकून शरण ये. तरी देखील ह्या सर्वोच्चतेच्या आणि अगाध अनंतांत अवगाहन करण्याच्या सर्व कल्पना फोल आहेत; कारण यांवरून ह्या आत्म्याच्या विशालतम अवस्थेची यथातथ्य कल्पना करतां येणार नाहीं. हा आत्मा केवळ दृश्यही नाहीं आणि अदृश्य दार्शनिकही–नाही तो त्याहूनही अतीत अस्तित्वाच्या जाणीवे पलीकडील आहे. तो वर्णनातीत. तो अगम्य अतर्क्य, शेवटपर्यंत अगम्य–शेवटचा–अखेरचा.


हा मानवाच्या श्रेष्ठतेचा महिमा कोण गाईल? ह्या मोठेपणाला आम्ही दोष देऊं शकूं काय? अहो, हा मोठेपणा आम्ही मिळवला ! तो वस्तूंच्या दिव्यत्वाच्या हक्कान्वये प्राप्त होणारा आमचा हक्क आहे आणि सतत तसा राहणार आहे. कारण मानवाचा मोठेपणा हा अंतिम अनंत परमेश्वराचाच मोठेपणा. तोच मानवांत प्रतीत झालेला आहे हे यथार्थतेनें कोणाला समजणार ? मानव हाच परमेश्वर; परमेश्वर हाच मानव. होय, खरोखरच हें सर्व अखिल विश्व अगाध अनाकलनीय विश्वव्यापी अवतार स्वरूप आहे. हें अनंत विश्व म्हणजेच परमेश्वर आणि परमेश्वर म्हणजेच विश्व. हा अखिल विश्वांचाही विश्व तोच पंचमहाभूतात्मक विश्व तोच. तोच सर्वत्र परिपूर्ण भरलेला. जे दिव्य आत्मतत्त्व चंद्रसूर्य तारांगणांत सर्वोच्च आकाशमंडळांत, तेंच सर्वोच्च पर्वतशिखरावर, अतिसपाट कळणाऱ्या मैदानावर, निर्झराचें गुंजन आणि प्रपाताचें धडक तोच. सागराच्या भयंकर गर्जना तोच आणि गंभीर विशाल शांत स्वरूप तोच. स्वरूप तोच. सागराचे उच्छवास आणि निश्वास तोच. नित्य अमर्याद, अनंत उत्कट अवस्थेंत अवस्थेत राहणारा, गुलाब पुष्पांतील सुवासाप्रमाणें, रजनीच्या शांततेप्रमाणें, निर्झराच्या शांत आश्वासाप्रमाणें, सागराच्या परिसरांत असणाऱ्या वाळूप्रमाणें, नित्यबर्फाच्छादित उत्तुंग शिखर तोच, पेटता–भडकता ज्वालामुखी तोच, त्यांहूनही विशेष मानवाच्या हृदयांतील तोच. सर्वांत श्रेष्ठ. ह्या दिव्यत्वाशिवाय कांहीं नाहीं. ह्या दिव्यत्वा शिवाय दुसरे निराळे कोणाला काय आढळलें आहे ? अहो ! पण पहा ! जें दिव्यत्व आपण सर्वत्र धुंडाळत होतो, जें दृग्गोचर व प्रतीत व्हावे म्हणून आम्ही ईश्वराची प्रार्थना केली, ज्याच्यासाठीं आम्ही आकाशपताळ एक केले तें दिव्यत्व इतकें आपल्या नजीक आहे. अगदीं जवळचे दिसते, ऐकतां येते त्यापेक्षांही इतके नजीकचे आहे

मानव हा एक अवतार आहे. हें अवतारस्वरूप आपण ओळखूं. याची स्फूर्त

ल्पना फार फार दूरची, ती कोणाला गवसणार ! दे तर, मानवा, हे प्रयत्न सोडून. तुझे अस्तित्व अनुभवजन्य आहे. तुझ्या सभोंवती आणि अंतरंगांत जें दिव्यत्व आहे ते ओळखायला शीव मनाचें अवगंठन जे शरीर त्याचे दिव्यत्व ओळख. शरीर आणि मन हे दुसरे अलग कांहीं नसून तुझ्याच आत्म्याच्या अतिश्रेष्ठ मोठेपणाच्या अस्पष्ट छाया आहेत ! हा आत्मा पहा ! मानवा ह्या आत्म्याची तूं कधी ओळख करून घेतली आहेस काय ? संपूर्ण नित्य सुखांत वावरणारा आत्मा म्हणजे 'तूं' ह्याच्या संपर्कांत तू कधीं आला आहेस काय ? तू म्हणजे केवळ शरीर नव्हेस. 'तूं म्हणजे शरीर ही खुळी कल्पना ! तुला कोणी सांगितली ? छे : हे तुझ्याच अज्ञानामुळे ! 'उत्तिष्ठत' — 'जाग्रत' हो ! अत्युच्च शिखर उत्युच्च ध्येय गांठल्याशिवाय थांबूं नको ! ह्या दिव्यत्व साधनेसाठीं आपण प्रयत्नांची पराकाष्ठा—आकाशपाताळ एक करूं. जे दिव्यत्व आज-पर्यंत कोणी पाहिले नाहीं ऐकले नाहीं पण जे सतत आपले भवितव्य घडवित असते, रंगरूप देऊन उत्क्रांत होत असते आणि ज्याची बरोबरी कोणी करूं शकणार नाहीं असे हे दिव्यत्व ! जीवन हा शेवटीं एक प्रकारचा खेळच आहे आणि ह्या विश्वांत ह्या श्रेष्ठत्वाच्या प्राप्तीसाठीं आपला सर्व शोध चालू असतो. हे स्वरूप आपण नित्य ओळखूं, आपल्याशीं सतत पटवूं, गर्जना करून सांगूं.

प्रत्यक्ष सूर्याला आपण सांगू 'तूं छोटा,' चंद्राला बजावू 'तूं आपला प्रकाश मानवाच्या विशाल आणि तेजस्वी आत्म्यापासून. जो मानवी आत्मा परमेश्वराच्या आत्मस्वरूपाशीं निगडित आहे. उसना घेतला आहेस'

—'पुरुषार्थ' मासिकाच्या सौजन्यानें



# धार्मिक ग्रंथांचे पहिले महाराष्ट्रीय प्रकाशक

—लेखक : पु. वा. कुलकर्णी

इतिहासाचार्य राजवाडे ह्यांनीं मुद्रणकलेच्या महत्त्वासंबंधानें आपल्या लेखांत प्रकट केलेले विचार खरोखर मननीय आहेत. पेशवाईच्या काळांत मुद्रणकलेच्या महत्त्वाचें आकलन झालेलीं माणसें मात्र अगदींच नव्हतीं असे नाहीं. नाना फडणविसांचें लक्ष गीता-ग्रंथ छापून काढण्यापुरतें तरी ह्या कलेकडे होतें. हें आतां पुराव्यानिशीं सिद्ध झालें आहे. परंतु इतिहासाचार्य राजवाडे ह्यांस त्याची त्या काळीं खबर लागली नव्हती, असें दिसतें.

ज्यांच्या बुद्धिमत्तेची झेंप चौफेर पोहोंचेल अशा सर्वगामी बुद्धिमत्तेचें त्या काळीं दुर्भिक्ष होतें हेंच खरें.

ह्याच मुद्रणकलेच्या महत्त्वास अनुसरून पेशवे काळासंबंधी लिहितांना सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक प्रा. त्र्यंबक शंकर शेजवलकर ह्यांनीं काढलेले उद्गारही मनन करण्याजोगे आहेत. ते म्हणतात:—

"तत्कालीन युरोपीय ज्या अनेक उपयुक्त कलांत निपुण होते, त्यांतील पहिली छापण्याची कला. वास्को द गामा इकडे येण्यापूर्वीच या कलेचा शोध लागलेला असून हिंदुस्थानांतसुद्धां पोर्तुगिजांनीं ती कला चालू केली होती. गोवें, कंगानूर वगैरे ठिकाणीं त्यांनीं बायबलें छापण्याचे कारखाने काढले होते. एका जेझुईट पाद्रीबोवानें अकबर बादशहास स्पेनच्या दुसऱ्या फिलिप बादशहासाठीं मुद्दाम छापलेली बायबलची एक बहुमूल्य सुंदर प्रत नजरही केली होती. त्यानें त्या प्रतींतील येशू व मेरीचीं चित्रें पाहून त्यांच्या प्रती आपल्या चित्रकारांकडून करून घेतल्या. पण एवढ्या शहाण्या अकबरासही इकडे छापखाना काढणें फायदेशीर आहे, हें सुचलें नाहीं. जी गोष्ट अकबरासारख्या जगद्विख्यात शहाण्याची, तीच नानासाहेबांची. चौकसपणानें दुसऱ्याचा ठाव घेऊन त्याच्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण करावें हें आम्हांस ठाऊकच नाहीं."

ह्यावरून गणपत कृष्णाजींसारख्या एका खेडवळ, गरीब नि साध्यासिध्या माणसाच्या अंतःकरणांत मुद्रण-कलेनें व मुद्रण-यंत्रानें जें कायमचें ठाण मांडलें नि सर्व प्रकारें असहाय्य परिस्थितींत असतांही त्या क्षेत्रांत त्यांनीं जी अविस्मरणीय कर्तबगारी गाजवून दाखविली, त्याबद्दल त्यांचें करावें तेवढें कौतुक थोडेंच होईल, असें वाटल्याशिवाय रहात नाहीं.

गणपत कृष्णाजी ज्या मिशन प्रेसमध्यें २।३ रुपये पगारवर वावरत होते, त्या

मिशनऱ्यांत शिळा–प्रेस होता, त्याचप्रमाणें खिळा–प्रेसही होता. दोन्हीं प्रेसवर भराभर कागद छापून बाहेर पडत होते नि त्यांचीं पुस्तकें बांधून तीं खिस्ती–धर्माच्या प्रसारासाठीं बाहेर पाठविलीं जात होतीं. स्वधर्मप्रसारासाठीं परक्या व दूरच्या देशांतील लोकांनीं येथें येऊन नि मुद्रण यंत्रांचें सहाय्य घेऊन हा जो एद्योग बिनबोभाटपणें चालविला आहे, तो आपण हात जोडून स्वस्थपणें बसून पहायचा काय ? तशा प्रकारचें प्रचार–यंत्र तयार करून आपल्या धर्माला, समाजहिताला पोषक अशा प्रकारची वाङ्मय–निर्मिति आपण कां करूं नये ? अशा प्रकारचे विचार गणपतला अस्वस्थ करूं लागले ! ते उन्नत नि धर्माभिमानाचें पोषण करणारे विचाचा होते; परंतु ते आचरणांत कसे आणायचे ? त्यासाठीं जरूर असलेल्या साधनांपैकीं त्याच्याजवळ एकही नव्हतें. सारी निर्मिति शून्यांतून करायची होती.

गणपत मनानें खंबीर होता नि शरीरानें धडधाकट होता. मनांत सतत घोळणारा विचार आचरणांत आणण्यासाठीं त्याची धडपड अविरत चालू होती. आपलें काम चोख रीतीनें करून त्यानें आपल्या मालकाची अर्थात् थॉमस ग्रॅहॅमची मर्जी संपादन करून घेतली. मुद्रणकलेच्या क्षेत्रांतील तोच त्याचा गुरु. ह्या गुरूची त्याच्यावर कृपा होती. घांसकाम करतां करतां मुद्रण–व्यवसायांतील एकेक पायरी तो चढत जात होता. हुषार माणसाला वाव देण्याइतका थॉमस ग्रॅहॅम उदार होता. गणपतनें त्याचा फायदा घेतला.

तो काळ शिळा–प्रेसचा होता. मागें सांगितल्याप्रमाणें ही छपाईची, ज्ञानप्रसाराची नि धर्मप्रसाराची कला मिशनऱ्यांनीं ह्या शहरांत आणिली. गणपत कृष्णाजींनीं अमेरिकन मिशन–प्रेसमध्यें प्रवेश केला, त्यवेळी छपाईचे सारें काम शिळाप्रेसच्या सहाय्यानें केलें जात असे. खिळा प्रेससाठीं मराठी नि गुजराती मुद्रिका तयार होऊं लागल्या होत्या.

छापण्याची कला ही त्या काळीं एक आश्चर्याचा विषय होऊन राहिली होती. सर्वांना त्याबद्दल फार मोठें कुतूहल वाटत असे. मुंबई वर्णन ' कार गोविंद नारायण माडगांवकर हे त्या काळच्या लोकांना छापील कागदाबद्दल किती आश्चर्य वाटत असे याची माहिती करून देतांना आपल्या ' मुंबई वर्णन ' ग्रंथांत लिहितात कीं, " भरतखंडांतील लोकांस शिळाछाप म्हणजे काय व ठसेछाप म्हणजे काय हें पुष्कळ वर्षेपर्यंत ठाऊक नव्हतें. छापल्यानें कागदावर अक्षरें निघतात व त्यापासून पुस्तकें तयार होतात म्हटलें म्हणजे या लोकांस मोठें अम्दुतच वाटे. एकादा छापलेला कागद पाहिला म्हणजे स्वर्गाहून विमान आल्यासारखे लोक पहायला जमत. "

इतर लोकांप्रमाणें गणपत कृष्णाजी ह्यांनाही छापलेला कागद हा एक कुतूहलाचा विषय होऊन राहिला असल्यास नवल नाहीं. अशी ही कला आपण साध्य करून घेतली पाहिजे नि तिचा सदुपयोग आपण हिंदुधर्मप्रसाराच्या व समाजोन्नतीच्या

कामीं केला पाहिजे, ह्या विचारानें छपाईच्या साधनांकडे अर्थात् त्यासाठीं लागणाऱ्या
शिळा, कागद, शाई वगैरेकडे ते अत्यंत बारकाईनें नि चौकस दृष्टीनें लक्ष पु
लागले. ही कला आपण साध्य करून घ्यावयाचीच, अशी ईर्षा त्यांच्या मनांत आ
भापासूनच उत्पन्न झाली.

गणपत कृष्णाजींचें ह्या बाबतींत आरंभापासून ध्येय कोणतें होतें नि तें सा
करून घेण्यासाठीं त्यांनीं कसकसे प्रयत्न केले, ह्याचा परिचय करून देतांना मुंबई
वर्णनकार लिहितात कीं, [ १८६३ ] " मिशनऱ्यांचीं पुस्तकें छापून बाहेर पडलेलीं
पाहून गणपत कृष्णाजी यांच्या मनांत शके १७६२ म्हणजे सन १८४० मध्यें आ
कीं, आपणही असाच कारखाना उभारून हिंदुधर्मप्रकरणीं व दुसरी पुस्तकें छापावीं
परंतु छापायाचीं साधनें यांजपाशीं कांहीं नव्हतीं. व तीं त्या वेळीं मुंबईत उपलब्ध
नसत. मग त्यांनीं अमेरिकन मिशनरींची कृतीपाहून स्वतः आपल्या युक्तीनें प्रे
( छापखाना ) तयार करण्याचे उद्योग मांडले. हे गृहस्थ भंडारी जातीचे अस
कुशल, बुद्धिमान् धोरणी व हिंदुधर्मावर निष्ठा ठेवणारे होते. प्रथम त्यांनीं ए
लाकडी यंत्र आपल्या हातानें तयार केलें; आणि लहान शिळांचे तुकडे जिकडून तिकडू
जमवून त्यांवर अक्षरें कशीं उठतात ही कृति करून पाहिली; मग शाई वगैरे कशी क
तात, त्याच्या शोधास ते लागले. प्रथम त्यांनीं आपल्याच तर्कानें दोन चार प्रकारची
शाई करून पाहिली. मग हळुहळु श्रम आणि उद्योग हींहीं करून त्यांनीं ही सर्व कृति
साध्य करून घेतली. जसजसें हें काम त्याला साधत गेलें, तसतशी उमेद येऊन
त्यांनीं सर्व गोष्टी आपणांस अनुकूल करून घेतल्या. त्यांचें सगळें धोरण छापखान्याच्या
तें त्यांनीं साध्य करून घेतलें. मग त्यांनीं एक लोखंडी प्रेस करवून मोठ्या शीला विकत
घेऊन लहान लहान ग्रंथ छापण्याचें काम सुरू केलें. "

अशा कार्यांत द्रव्यसहाय्याची जरूरी किती असते, हें का सांगितलें पाहिजे?
तें गणपत कृष्णाजींपाशीं होतें कुठें ! परंतु त्याच्या अभावीं ते हातपाय आंखडून
निराशेनें स्वस्थ बसून राहिले नाहींत. ही नवीन सुधारणा आपल्या लोकांना उपकारक
होऊन राहाणार आहे नि ती आपण हस्तगत केली पाहिजे, ह्या एकमेव भावनेनें
विपरीत परिस्थितीशीं ते निकरानें झगडले.

मुंबईत त्या काळीं महाराष्ट्रीय समाजांत पुष्कळ धनिक लोक होते; परंतु एका
उपयुक्त नवीन सुधारणेचें स्वागत करून ती हस्तगत करून घेऊन लोककल्याणासाठीं
राबविण्याच्या इच्छेनें मोठ्या ईर्षेनें धडपडणाऱ्या ह्या उत्साही व धर्मभावनेनें भारल्या
गेलेल्या तरुणाकडे त्या काळीं कोणाचेंही लक्ष गेलें नाहीं. कशाला लक्ष जाईल?
ज्याला एकाद्या गोष्टीचा ध्यास लागलेला असतो, त्याच्यासाठीं जिवाची तळमळ
चाललेली असते, ती पूर्ण करून घेण्यासाठीं त्या एकट्यानेंच परिस्थितीशीं प्राण
जाईतों झगडायचें असतें ! त्या अवस्थेंत असतां तुमच्या वाऱ्याला सहसा कोणीही

उभा राहाणार नाहीं किंवा तुमच्या हालअपेष्टांकडे कोणी ढुंकूनही पहाणार नाहीं! त्या दिव्यांतून तुम्हीं सहीसलामत पार पडलां, म्हणजे मग मात्र तुमचे गोडवे मुक्तकंठानें गायिले जातील नि तुम्हांला आरत्या ओंवाळल्या जातील!

गणपत कृष्णाजींजवळ त्या धडपडत्या काळांत कोणी आला नाहीं नि तेही कोणाजवळ गेले नाहींत. स्वावलंबनानें जें कांहीं साध्य करून घेतां येईल तें पदरांत पाडून घ्यावयाचें नि अंगभूत कल्पकतेच्या नि चिकाटीच्या बळावर अंगीकृत कार्यांत आपण यशस्वी होऊं, ह्या निष्टेनें ते रात्रंदिवस परिस्थितीशीं झगडत होते.

वर सांगितल्य प्रमाणें छापखान्यांत जें जें लक्ष लावून पहायचें, त्याचे घरीं आल्यानंतर प्रयोग करून पहावयाचे. कधींकधीं ते प्रयोग फसायचेही!

प्रयोग करायला तरी साधनें नि पैसा लागतोच कीं नाहीं? तो त्यांच्याजवळ नव्हता, म्हणून का ते अडून राहिले? कुठून ना कुठून मोडक्या तोडक्या शिळा मिळवून आणायच्या, त्या घांसून पुसून साफ करायच्या, शाई मिळवून तिनें शिळेवर लेखन करायचें नि ते कागदावर बरोबर उमटतें कीं नाहीं, हें पहायचें. हा त्यांचा उद्योग फावल्या वेळांत सतत चालू होता. त्यांना विसांवा ठाऊक नव्हता.

ह्या बाबतींत एका कलेचें त्यांना वरदान होतें. शिळा-प्रेसवर कांहीं छापायचें झाल्यास प्रथम हातानें लेखन करावें लागतें. गणपतजींचें हस्ताक्षर फार सुंदर होतें. एवढेंच नव्हे तर ते वेलबुट्टी, चित्रें काढण्यातही वाकबगार होते. नुसतें लेखन काय कामाचें? लेखन-कला आणि चित्र-कला ह्यांची सुंदर सांगड घातली गेली पाहिजे. ह्या दोन्ही कला सख्या बहिणी आहेत. लेखनाला सुंदर सजावट पाहिजे. कोणतेंही पुस्तक असो; तें सचित्र असावें, असें आजच्या प्रगमनशील काळांत आपण म्हणतों; परंतु सव्वाशें वर्षांपूर्वीच्या काळांत गणपत कृष्णाजींनीं छपाईच्या क्षेत्रांत ह्या उपयुक्त नि परिणामकारक सुधारणेचा रिक्तहस्तांनीं अवलंब केला, ह्या जाणीवेनें कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं?

त्या काळीं गणपत कृष्णाजींपुढें एक-दोन नाहींत, तर किती तरी बिकट प्रश्न आ वासून उभे होते. एकाद्या धार्मिक पोथीचें पान मनोहर अक्षरांत लिहून त्याल सुंदर वेलबुट्टीच्या चौकटीत बसविणें हा गणपतजींच्या हातचा मळ असला तरी शिळाप्रेसची उभारणी करणें, ही गोष्ट त्यांच्या हातांतील नव्हती. शिळाप्रेतसारखें छापण्याचें साधन निर्माण करण्यासाठीं त्यांना भारी कष्ट करावे लागले. स्वतःच्या अक्कलहुशारीनें नि हिंमतीनें त्यांनीं एक लाकडी शिळा-प्रेस बनविला. जरूर असलेल्या शिळा महत् प्रयासानीं मिळविल्या नि त्यांनीं स्वतः बनविलेल्या शिळा-प्रेसवर छोटीं छोटीं स्तोत्रें प्रयोगादाखल छापण्यास सुरुवात केली. जवळ पैशांचें पाठबळ नसलेल्या एका हिकमती, उद्योगी नि हिंमतबहाद्दर महाराष्ट्रीय तरुणाची त्या काळांतील ही कर्तबगारी वाखाणण्याजोगी नाहीं, असें कोण म्हणेल?

एवढ्यानें काय झालें ? त्या काळीं गणपत कृष्णाजींना अनेक पेंचप्रसंगांतून पार पडावें लागलें होतें. छापील पुस्तकें म्हणजे नवी नवलाई असली तरी बहुसंख्य अज्ञ नि भोळ्या वृत्तीचे लोक छापील पुस्तकांस स्पर्श करायला बिलकुल तयार नव्हते. त्याला तसेंच कारण होतें. आरंभकाळांत मिशनऱ्यांच्या छापखान्यांतून जीं चोपडीं बाहेर पडलीं, तीं येशूख्रिस्ताचें 'शुभवर्तमान' जाहीर करणारीं होतीं. त्यामुळें छापील पुस्तकें म्हणजे ख्रिस्ती-धर्माच्या बायबलसंबंधीं पुस्तकें, असा समज फैलावला होता. तो दूर होण्यास कांहीं काळ लोटावा लागला. आणि तो समज दूर करण्यांत गणपत कृष्णाजींच्या नवीनच स्थापन झालेल्या शिळा-प्रेसनें त्या काळीं फार महत्त्वाचा भाग घेतलेला आहे. त्यांच्या छापखान्यांतून आरंभकाळांत जीं लहानसहान पुस्तकें छापून बाहेर पडलीं, तींही धार्मिक स्वरूपाचीं होतीं; आणि तीं अर्थातच हिंदुधर्मासंबंधीं होती.

परंतु हिंदुधर्मविषयक पुस्तकें छापून बाहेर पडलीं तरी त्यांचा सार्वत्रिक प्रसार होण्याच्या आड येणाऱ्या इतर कांहीं दुर्धर अडचणी होत्या. त्या काळांतील लोकांच्या सोवळ्या—ओवळ्यासंबधींच्या कल्पना मोठ्या विचित्र होत्या. आज त्या कल्पना ऐकून खरोखर कोणालाही हंसूं येईल !

धार्मिक—ग्रंथ किंवा पोथ्या, पुराणें सोवळें नेसून वाचावयाच्या असतात ना ! परंतु छापील पुस्तकांप्रमाणें भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणारी दुसरी कोणती बरें वस्तू असूं शकेल ? हा भ्रष्टाचार एकेरी नव्हे, तर तिहेरी स्वरूपाचा होता ! कसा तो पहा ! सुती शिवण, कापडी वेष्टन नि चरबीमुळें शाईचें भ्रष्टीकरण ! पुस्तक छापील असलें तरी त्याला ह्या तीन महा-पापांचा स्पर्श झाल्यामुळें पुराणमतवादी वृत्तीचे लोक छापील पुस्तकांस निषिद्ध समजत असत !

छापील कागदांस शिवणें व त्यांचा घरांत प्रवेश होऊं देणें, हें अपवित्र नि धर्मबाह्य आहे, ह्या समजुतीचा पगडा तत्कालीन जनमनावर कशा रीतीनें नि किती प्रमाणांत बसला होता, ह्यासंबंधीं उल्लेख करून 'मुंबईवर्णन'कार गोविंद नारायण माडगांवकर हे आपल्या 'मुंबई-वर्णन' ह्या ग्रंथांत लिहितात कीं, "आमचे कित्येक भोळे व नैष्ठिक ब्राह्मण छापलेल्या कागदांस स्पर्श करण्यास भीत असत; आणि अद्याप मुंबईत व बाहेर, छापील कागदास शिवत नाहींत व छापलेलें पुस्तक वाचीत नाहींत, असे पुष्कळ सांपडतील."

१८२५ ते १८३० हीं ५।६ वर्षें गणपत कृष्णाजी अक्षरशः रात्रंदिवस शिळा-प्रेसची उभारणी करण्याच्या उद्योगांत सतत गुंतलेले होते. त्यांना प्रयोग करून पहाण्याचा मुळींच कंटाळा नव्हता. शाईत चरबी असते म्हणून लोक छापील पुस्तकांस स्पर्श करायला तयार नाहींत. मग चरबीशिवाय शाई बनविण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला नि त्या उद्योगांतही त्यांनीं दीर्घ प्रयत्नांतीं यश मिळविलें. चरबीऐवजीं तुपाचा

उपयोग करून त्यांनीं छापण्याची शाई तयार केली. तत्कालीन परिस्थितीवर त्यांनीं मिळविलेला हा एक मोठाच विजय होता. कारण त्या काळीं रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक ह्यांच्यासारखे 'आंग्लविद्याविभूषित विद्वान नि पुढारलेले लोकही ज्या पोथ्या सोवळ्यानें वाचीत, त्या हस्तलिखित असत!'

शेवटीं सर्व सुसज्जता झाल्यानंतर गणपत कृष्णाजींनीं १८३१ सालीं नोकरीला रामराम ठोकून स्वतःचा छापखाना सुरू केला. वर सांगितल्याप्रमाणें ही जी छापखान्याची मुहूर्तमेढ त्यांनीं रोवली; तिच्यामागें त्यांचा मुख्य हेतु मिशनऱ्यांच्या धार्मिक हालचालींस तोंड देणें व मुद्रण-यंत्राच्या सहाय्यानें आपल्या धर्मबंधूंची सेवा करणें हा प्रामुख्यानें होता. हा शिळा छापखान्याचा शुभारंभ त्यांनीं बोरीबंदरजवळ जुनी जांभळी मशिद होती, त्या मशिदीजवळच्या एका चाळींतील खोलींत केला.

गणपत कृष्णाजींचा धर्माभिमान जाज्वल्य होता नि त्या अभिमानामुळें त्यांचें लक्ष छापखान्याची स्थापना करण्याकडे वळलें. मुंबईत येऊन छापखान्याच्या व्यवसायाशीं संबंध जडल्यापासून महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें गणपत कृष्णाजींना एक उणीव तीव्रतेने जाणवत असे. कोणती ती उणीव? तिथी, वार, मुहूर्त, सण वगैरे समजण्यासाठीं पंचांगाची फार जरूरी असते. इंग्रजी कॅलेंडर इंग्रज लोकांची गरज भागवीत असे. त्याचप्रमाणें गुजराती जाणणाऱ्यांसाठीं एक गुजराती पंचांगही प्रसिद्ध झालें होतें. मग महाराष्ट्रीयांनीं मुहूर्त, सणवार वगैरे जाणून घेण्यासाठीं उठतांबसतां शास्त्रीबुवांकडे धांव घ्यायची का? पंचांग हें पदोपदीं उपयोगी पडणारें एक धार्मिक साधन आहे. तें आपल्या धर्मबंधूंना सहज उपलब्ध झालें पाहिजे, असें गणपत कृष्णाजींना वाटून प्रथम त्यानीं आपल्या सुसज्ज शिळा प्रेसवर पंचांग छापून प्रसिद्ध केलें.

---

# धर्मात्मा शेठ जावजी दादाजी

## अल्प परिचय

'शतायुषी भव' असा आशीर्वाद दिला जातो; परंतु तो फळास आले क्वचित्च आढळून येतो. एकाद्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या वाट्यास शंभर वर्षां जीवनक्रम येणें ही एक महत्वाची नि अभिनंदनीय घटना समजली जाते ती त्यामुळे तो दुर्मिळ सुयोग यावर्षी मुंबईतील निर्णयसागर मुद्रणालयाच्या वाट्यास सुदैवा आलेला आहे.

ह्या संस्थेच्या जन्मदात्याचे नांव आहे शेठ जावजी दादाजी चौघरी. त्यांचा जन्म मुंबईत उमरखाडी येथें १८३९ साली झाला. त्याकाळीं त्या घरांत शिक्षणाचा प्रवेश झालेला नव्हता. वडील का पेढीवा मालकाच्या हुकुमाप्रमाणें वसुलीचें काम करीत, आई श्रीमती काशीबाई संसाराचा गाडा कसाबसा रेटीत असत. आपणास शिक्षणाचा लाभ होऊं शकला नाहीं म्हणून कष्टाचे जीवन वाट्यास आलें, तेव्हां मुलाने शाळेत जाऊन शिकावें ह्या हेतूनें जावजीस जवळपासच्या एका मिशनरी शाळेंत दाखल करण्यांत आलें; परंतु ह्या मुलाचें लक्ष अक्षरओळख करून घेण्यापेक्षां समवयस्क सव ंगड्यांबरोबर खेळणें, भटकणें, ह्याकडेच असे. त्याच्याकडे लक्ष द्यायला वेळ कोणाला होता? इतक्यांत वडिलांनीं इहलोकची यात्रा संपविली नि सारी जबाबदारी मातोश्रीवर येऊन पडली. मुलाचें नि आपलें पोषण झालें पाहिजे ह्यासाठीं ती माउली फूटपाथवर बसून फळें विकण्याचा व्यवसाय फावल्या वेळांत करून रोज ५–६ आण्यांची कमाई करीत असे.

वयाच्या दहाव्या वर्षी जावजींना आईच्या कष्टांची जाणीव होऊन आपण कांहीं ना कांहीं उद्योग करणें जरूर आहे, असें वाटूं लागलें. त्यावेळीं त्याना स्वतः च्या व वडिलांच्या नावाची मिळून सहा अक्षरें ( जावजी दादाजी ) लिहायला नि वाचायला येत असत. एवढ्या भांडवलावर जावजी नोकरीच्या शोधार्थ घराबाहेर पडले.

फिरतां फिरतां ते भेंडीबाजारांत आले. त्या भागांत यंत्राचा आवाज त्यांच्या कानीं पडला. तो आवाज जणूं काय आपणांस आपुलकीनें हांक मारीत आहे, असा त्यांना भास झाला. त्या आवाजाच्या रोखानें मोठा धीर करून त्यानीं त्या यंत्रालया-पर्यंत मजल मारिली.

पहातात तों काय? मिशनऱ्यांनीं स्थापन केलेला तो एक छापखाना होता.

थॉमल ग्रॅहॅम ह्या नावाचा ह्याच देशांत जन्मलेला, मराठी नि गुजराती भाषा जाणणारा ख्रिस्ती गृहस्थ. तो हुन्नरी व मुद्रिका पाडण्यांत तरबेज होता. तयार केलेले टाईप घासण्यासाठीं त्याला मदतनीस मुलांची जरूरी होती. जावजीनें सलाम करून त्याच्यापुढें नोकरीचा प्रश्न ठेविला, तेव्हां प्रथम त्यानें शिक्षणासंबंधीं चौकशी केली व एका क्षणांत जावजीच्या नोकरीचा प्रश्न त्यानें सोडविला.

दरमहा दोन रुपये पगारावर टाईप घासण्याच्या कामगिरीवर जांवजींची नेमणूक झाली. ते आपलें काम मन लावून करूं लागले. हें काम करतां करतां त्यांना अक्षर ओळख झाली. एवढेंच नव्हे तर अक्षरें कशीं कोरावीं हेंही ते शिकले; त्यांची धारणाशक्ति दांडगी होती. आपण कांहीं तरी उद्योग केलाच पाहिजे, अक्षरविद्या आपण शिकू शकलों नाहीं तरी अक्षरांस जन्म देणारी मातृका नि मुद्रिका तयार करण्याची विद्या आपण शिकून घेतली पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें.

टाईम्स, इंदुप्रकाश, ओरिएंटल हे त्या काळांतील मोठे नि टाईप पाडण्याचा संसार सांभाळणारे छापखाने. ज्या कलेची कांस पकडली त्यांत तरबेज होण्याच्या हेतूनें जावजींनीं पगाराची फारशी पर्वा न करतां वरील तिन्हीं ठिकाणीं आपल्या आयुष्यांतील ऐन उमेदीचीं कांहीं वर्षे घालविलीं.

शेवटीं ओरिएंटल प्रेसमध्यें दरमहा तीस रुपये पगारावर ते टाईप पाडण्याचें खातें समर्थपणें संभाळीत होते. तेथें असतां त्यांना त्या कलेंतील समर्थपणाचा साक्षात्कार झाला. आपण नोकरीचें बंधन तोडून स्वतंत्रपणें टाईप तयार करण्याचा कारखाना सुरू करावा असे त्यांना वाटूं लागलें. आणि याच काळांत त्यांना यदृच्छेनें समविचारी नि समव्यसनी अशा एका सहकाऱ्याचा लाभ झाला. त्यांचें नाव राणूजी आरु. ह्या दोघांनीं मिळून देवनागरी मुद्रिकांच्या क्षेत्रांत संस्मरणीय नि ज्ञानप्रसारकार्याला सर्वकाळ अत्यंत उपकारक होऊन रहाणारी कामगिरी, नंतरच्या काळांत पार पाडलेली आहे. हीं दोन्हीं नावें मुद्रणक्षेत्रांत आजकाल चिरस्मरणीय नि वंदनीय होऊन राहिलीं आहेत.

जावजी शेटनीं १८६४ सालीं खुमाशेठ नामक मारवाड्याकडून सातशें रुपये भांडवल मिळवू टाईप पाऊडीची स्थापना केली. ही अक्षरसाधना करण्यासाठीं सतत पंधरा वर्षे ते परिस्थितीशीं झगडले. त्यांच्या कारखान्यांत तयार होणाऱ्या अक्षरमुद्रिकांचा दर्जा आरंभासून अत्यंत उच्च होता. त्यामुळें महाराष्ट्रांतच नव्हे तर भारतभर व परदेशातही त्यानीं लोकप्रियता मिळविलेली.

१८६९ सालीं जावजीशेटनीं निर्णयसागर मुद्रणालयाची स्थापना केली ती पंचांग छापण्याच्या हेतूनें. गेलीं ९८ वर्षे निर्णयसागर पंचांगानें मिळविलेली लोकप्रियता अनन्यसाधारण आहे. खेड्यापाड्यांतून त्या पंचांगाचा सर्वत्र प्रसार झालेला आहे. त्यानीं देवनागरी मुद्रिकांना दिलेलें गोड नि सुंदर वलण जसें शंभर वर्षांचा

काळ लोटला तरी असामान्य नि लोकप्रिय होऊन राहिलें आहे, तसेंच भाग्य निर्णय-सागर पंचांगाच्या वाट्यास आलें आहे.

जावजी शेटनीं मुद्रिकांच्या क्षेत्रांत नांव मिळविलें तसेंच प्रकाशनक्षेत्रांतही मिळविलें. सर्व क्षेत्रांतील संस्कृत वाङ्मयाचें संशोधनपूर्वक नि सुयोग्य टाईपांत प्रकाशन ही त्या कालांतील त्यांची डोळे दिपवून टाकणारी अजोड कामगिरी आहे. विद्वान माणसें जोडण्याची व तीं सांभाळण्याची कला त्यांना साधलेली होती. त्यामुळे त्या काळांतील सारी विद्वान् माणसें त्यानीं आपल्याकडे वळवून घेतलीं व त्यांच्या सहाय्यानें त्यानी राष्ट्रोपयोगी, संस्कृतिसंवर्धक व ज्ञानसंवर्धक असें वाङ्मय सुंदर स्वरूपांत प्रसिद्ध करुन तें सर्वांना उपलब्ध व्हावें, यासाठीं त्याच्या किंमती अत्यल्प ठेविल्या.

त्यानीं बालगोपलांसाटीं 'बालबोध' मासिक सुरू केलें. सर्व शाखांतील संस्कृत वाङ्मय नियमितपणें व शुद्ध स्वरूपांत प्रसिद्ध करण्यासाटीं 'काव्य-माला' मासिक सुरू केलें. संत-वाङ्मय शुद्ध नि सुंदर स्वरूपांत प्रसिद्ध केलें. सुंदर व ठसठसीत टाईपांत पोथ्या, पुराणें, प्रसिद्ध करून भाविक लोकांची सोय केली. ऐतिहासिक कागदपत्र, बखरी वगैरे प्रसिद्ध करून इतिहासाचें दालन सजविण्याचाही त्यांचा विचार होता; त्यांच्या हयातींत त्यांना साध्य न झालेलें तें कार्य त्यांच्यामागें त्यांचे सुपुत्र तुकारामशेठ व पांडुरंगशेठ ह्यानीं 'इतिहास-संग्रह' मासिक सुरू करून यथाशक्ति पार पाडिलें.

जावजीशेठ ह्यानीं व त्यांच्या मागें त्यांच्या प्रेरणेनें जें संत-वाङ्मय, संस्कृत-वाङ्मय व इतर वाङ्मय निर्णयसागर मुद्रणालयांतून प्रसिद्ध झालें त्याची गणना हजारांनी करावी लागेल.

त्यानी मुद्रणक्षेत्रांत व प्रकाशन क्षेत्रांत झीज सोसून जी बहुमोल कामगिरी पार पाडिली, ती राष्ट्रकल्याणास सर्वतोपरी पोषक अशीच होती. आणि त्यामुळें निर्णयसागर ही एक राष्ट्रीय-संस्था होऊन राहिली आहे.


जावजीशेठजींचा स्वभाव अत्यंत निरहंकारी, दयाळू, परोपकारी व साधासिधा होता. व्यवहारांत त्यानीं कधींही कोणाचें मन दुखविलें नाहीं. छपाईच्या कामांत उच्चांत उच्च दर्जा सांभाळण्यासाटीं ते अहोरात्र झटले. शेठ जावजी दादाजी ह्यांनीं १८९२ सालीं इहलोकींची यात्रा रुपविली असली तरी मुद्रण-प्रकाशन क्षेत्रांतील आपल्या अजोड कामगिरीमुळें ते अजरामर होऊन राहिले आहेत.

जावजीशेठ ह्यांचें चरित्र व त्यांची कामगिरी प्रत्येकानें अभ्यासून आजच्या काळांत त्यापासून जरूर ती स्फूर्ति मिळविणें जरूर आहे. श्री. कुळकर्णीकृत पांचशें पानांच्या त्यांच्या चरित्रांत त्यांच्या कामगिरीचें विस्तरशः वर्णन करण्यांत आलें आहे.

त्या काळांत त्यानी जें कार्य पार पाडिलें त्यामुळें प्रत्येक मुद्रक प्रकाशकच नव्हे तर प्रत्येक जण मग तो कोणत्याही क्षेत्रांत वावरणारा असो, त्यांचा ऋणी आहे. हें

कधींही न फिटणारें ऋण कोणत्या प्रकारचें आहे, हें समजून घेण्यासाठीं प्रत्येक महाराष्ट्रीयानें व इतरांनींही त्यांचें समग्र चरित्र वाचणें नि अभ्यासणें जरूर आहे. हा चरित्रग्रंथ तयार करण्यासाठीं सध्यांच्या महागाईच्या काळांत फार खर्च करावा लागल; त्यामुळें त्या ग्रंथाची किंमत पंचवीस रुपये ठेवावी लागली तरी ता. ५ आगष्ट १८६७ पर्यंत जे ग्राहक हा ग्रंथ घेतील, त्यांना तो वीस रुपयांत देण्यांत येईल.

ज्याप्रमाणें व्यक्तीच्या, त्याचप्रमाणें संस्थेच्याही जीवनांत चढउतार सर्वत्र चालू असलेला आपण पाहातों. जावजीशेटनीं, त्यांच्या कर्तबगार चिरंजीवांनीं नि त्यांच्या-मागून आलेल्यांनीं सुमारें ६०।७० वर्षें या संस्थेचा गाडा यशस्वी रीतीनें चालविल्या-नंतर सभोंवारच्या बदलत्या परिस्थितीमुळें व आर्थिक अडचणींमुळें गेल्या ३०।४० वर्षांपासून पूर्वकाळीं वैभवाचे व संपन्नतेचे दिवस पाहिलेली ही मुद्रण-प्रकाशन संस्था आपलें जीवन कसेंबसें रेटीत आहे. परंतु या संस्थेला गेलीं दहा वर्षें वेळोवेळीं मदतीचा हात पुढें करणाऱ्या एका आदरणीय संस्थेचा या ठिकाणीं अत्यंत कृतज्ञता-पूर्वक उल्लेख केल्याशिवाय रहावत नाहीं. कर्तृत्वाचा उज्वल इतिहास पाठीशीं असलेल्या निर्णयसागर मुद्रणालयाकडे आमच्या समर्थ सरकारला लक्ष पुरविणें शक्य झालें नाहीं तें आवश्यक कर्तव्य पार पाडण्यासाठीं महाराष्ट्र बँकेचे चालक पुढें आले. याबद्दल त्यांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच होतील.



# " एकांताचें सुख देई मज देवा "

— तुकाराम

साधुवर्य तुकाराक आपल्या एका अभंगांत म्हणतात कीं, शांतीसारखें सुख नाहीं व शांतीव्यतिरिक्त स्थिति दुःखमय होय. शांति धारण केली असतां संसारसागर तरूण पैलतीरास जाणें शक्य होतें. शांतीचें महत्त्व बहुतेकांना माहीत असतें. किंबहुना मनुष्यमात्राचें हरएक कार्य, जाणून किंवा नेणून शांति मिळावी ह्यासाठींच होत असतें परंतु ज्या ठिकाणीं धडपड, गडबड, घाई व गर्दी असते अशा ठिकाणीं शांति लाभत नाहीं. ती एकांतांत वास करते. म्हणूनच तुकाराम महाराजांनीं परमेश्वरापाशीं ' एकांताचें सुख देईं मज देवा । आघात या जीवा चुकवुनी ' अशी मागणी केली आहे. तुलनात्मक दृष्टीनें पहातां त्यांचा काळ हल्लीपेक्षां शांतीचा होता व एकांताचें सुख लाभणें आतांपेक्षां अधिक सुलभ होतें. पण ह्या त्यांच्या प्रार्थनेबद्दल आपल्याला आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्याच्यापूर्वी शेंकडों, नव्हे हजारों वर्षें, ऋषिमुनींनीं एकांताच्या लाभाची प्रार्थना केलेली असून त्याच्या प्राप्तिसाठीं रानावनाचा मार्ग पत्करला होता. आमचा काळ हा धांदलीचा आहे. मनुष्याला घांसभर अन्न खाण्याला देखील धड फुरसत मिळत नाहीं. ह्या धडपडीच्या जीवनामुळें आम्हांला निसर्गाशीं सख्य करतां येत नाहीं. साधुसंतांच्या व अन्य महापुरुषांच्या चरित्रांचें आमच्याकडून परिशीलन, मनन व अनुसरण होत नाहीं व प्रत्यक्ष परमेश्वराशीं संभाषण करणेंहि अशक्य झालें आहे. आम्हांला गर्दीत व विजेच्या लखलखाटांत रहाण्याची संवय झाल्यामुळें काळोखाची भीति वाटूं लागली आहे. दिवसाची काळजी नाहींशी व्हावी व निद्रेच्या योगानें पुन्हां हुशारी व तरतरी प्राप्त व्हावी म्हणून रात्र उत्पन्न करण्यांत ईश्वरी योजना आहे हेंहि आम्ही विसरलों आहों.

प्राचीन काळीं ध्यान ही कला पूर्णत्वास पोहोंचली होती, ती आजच्या काळीं नष्ट झाल्यासारखी आहे. ऋषिमुनि, तपी एकांतांत जाऊन परमेश्वराचें ध्यान करीत व त्याचें सान्निध्य साधून आपलें जीवित उन्नत करीत. श्रेष्ठ प्रकारचे विचार मनांत यावयाला एकांतच पाहिजे. काळजीनें, क्रोधानें, कुविचारानें दूषित झालेल्या मनांत उच्च विचार व श्रेष्ठ महत्त्वाकांक्षा यांचा जन्म होत नाहीं. स्मरणशक्ति, प्रेम, सद्वासना व सुविचार यांची वाढ होण्यास एकांतच पाहिजे. ह्यासाठींच तुकाराम महाराजांनीं एकांताचा वास मागितला. कारण त्या ठिकाणी गर्दीचा अभाव असणार व माणसाच्या संगतीपेक्षां " वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें ॥ पक्षीहि सुस्वरें आळविती ॥" ही परिस्थिति अधिक श्रेयस्कर होऊन ' नाहीं गुणदोष अंगा येत ' अशी त्यांची खात्री कोणी एकानें म्हटलें आहे की, एकांताच्या अभावामुळें आमच्या तरुणांपुढें श्रेष्ठ ध्येय नसतें व आमच्या वृद्धांना उच्च प्रकारचीं स्वप्नें पडत नाहींत व ह्यामुळें सर्वच प्रकारच्या क्षेत्रांमध्यें कर्तबगारीचा अभाव दृष्टीस पडतो.

आजपर्यंत होऊन गेलेल्या धर्मसंस्थापक, साधुसंत, ऋषिमुनि, शास्त्रज्ञ, मुत्सद्दी, वि इत्यादिकांच्या चरित्रांचा विचार केला असतां आपल्याला स्पष्टपणें दिसून येतें ीं त्यांनीं एकांतवास व ध्यान ह्यांचें महत्त्व पूर्णपणें ओळखलें होतें व त्यांचा भरपूर भ घेतला होता. वशिष्ठ, विश्वामित्र, व्यास, कण्व ह्यांनीं एकत-वास स्वीकारला ह्याचें रण त्यांना शहरांत रहाणें अशक्य होतें म्हणून नव्हे बुद्धानें सर्वसंगपरित्याग करून वनाचा मार्ग धरला. जॉन धी बॅप्टिस्ट हा रानांत राहून टोळ खाऊन व मध पिऊन आपल्या पुढील आयुष्यांतील श्रेष्ठ कार्याची तयारी करीत होता. खिस्तानें चाळीस दिवस वनवास पत्करून मोहाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य प्राप्त करून घेतलें. पॉल साधूचें परिवर्तन झाल्यावर त्यानें अरबस्थानच्या वाळवंटांत एकांतांत बरेच दिवस काढले. लुथर, गटे, शेक्सपिअर, वर्ड्स्वर्थ हे एकांतवासाचे भोक्ते होते. प्रे. वुइलसन, जनरल गॉर्डन व लिंकन एकांतांत, प्रार्थनेंत व ईशचिंतनांत दररोज पुष्कळ वेळ दवडीत असत. आपल्याकडील आधुनिक उदाहरणें सर्वश्रुत आहेत. देवेंद्रनाथांचें आत्मचरित्र ज्यांनीं वाचलें असेल त्यांना हिमालयांतील एकांतापासून किती लाभ झाला हें कळून आलेंच असेल. तें चरित्र वाचतांना आपणांलाहि देवेंद्रांप्रमाणेंच एकांतसुखाचा लाभ होऊन आपण उच्चतर वातावरणांत वास करीत असल्याचा भास होतो. केशवचंद्र सेन ह्यांची ध्यानावर फार मदार होती. डॉ. सर रामकृष्ण भांडारकर एकांतासाटीं व सृष्टिनिरीक्षणाने होणाऱ्या सुखाच्या लाभासाटीं शांत ठिकाणीं फिरावयास जात. तुकाराम- बुवांनीं म्हटल्याप्रमाणें "तुका म्हणे होय मनाशीं संवाद। आपुलाची वाद आपणासी ॥" अशी स्थिति एकांतानें प्राप्त होते.

ग्रंथनिष्पत्तीच्या दृष्टीनें व कर्तबगारीच्या दृष्टीनें एकांत अत्यंत फलदायक असतो. रामायण, महाभारत वेद ह्यांसारखे ग्रंथ शहराच्या गर्दीत व धामधुमींत कधींच निष्पन्न झाले नसते. हल्लीं दर महिन्याला एक ग्रंथ ह्याप्रमाणें ग्रंथनिर्मिति करणारे लेखक पण त्या ग्रंथांचा मगदूर पाहिला म्हणजे लाजेनें मान खाली घालावी लागते. जॉन बनियनें यांत्रिक क्रमण हा ग्रंथ तुरुंगांतील एकांतवासांत लिहिला. टिळकांचें गीता-रहस्य ह्याच स्थितींत निर्माण झालें. आपलें नांव चिरस्मरणीय करणारी जोन ऑफ आर्क हिला राष्ट्रस्वातंत्र्याची स्फूर्ति मेंढ्या राखीत असतांनाच झाली ह्याप्रमाणें दुसरीं अनेक उदाहरणें देतां येतील, पण त्यांची आवश्यकता नाही. महात्मा गांधी ह्यांचें श्रेष्ठ उदाहरण आपणांपुढें आहेच. ते आठवड्यांतून एक दिवस एकांतांत तर दवडीत पण मौनहि धारण करीत. मनाची शांती, सुविचारांचा उद्भव, कर्तबगारीची वाढ, मानसिक शुद्धि, सृष्टिनिरीक्षणानें होणारे आध्यात्मिक लाभ हे सर्व एकांतानें प्राप्त होणारे असल्यामुळे आपणहि सर्वांनीं दररोज थोडा वेळ तरी एकांतांत बसून परमेश्वराचें ध्यान व प्रार्थना करणें हें आमच्या द्वारें आम्हांला आध्यात्मिक बलप्राप्ति होईल, इतकेंच नव्हे तर स्वकर्तव्याचा मार्गहि स्पष्ट दिसूं लागेल.

# संतश्रेष्ठ ज्ञानदेव महाराज

लेखक : वि. के. छत्रे

ज्ञानप्रभेनें जनिं पैठनांत । प्रकाशले श्रीहरि जे विशींत ॥
आळंदिला ठेविति जे तनूला । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥ १ ॥

ज्ञानोबा हे साक्षात् विष्णूचे अवतार. त्यांचे आजोबा गोविंदपंत. त्यांना गाय मंत्राच्या प्रदीर्घ उपासनेमुळें सच्छील व विरक्त असा पुत्र झाला. त्याचें ना विठ्ठल. या पुत्रालाहि वांडलांनीं गायत्री मंत्राची दीक्षा दिली व त्या उपासनेमुळें केव विशींत पैठणांत आपल्या ज्ञानाच्या प्रभेनें प्रकाशणारे व लोकांना ज्ञानेश्वरीसारख ग्रंथातून आत्मज्ञानाचें अमोल भांडार मुक्तहस्तानें देऊन आळंदीला लवकरच बावि साव्या वर्षी समाधि घेणारे ज्ञानोबा हे सत्पुत्र लाभले.

संन्यास खोटेंच वदून घेई । सत्योदयीं ज्या गुरु धाडि गेहीं ॥
विरक्त ऐशा वरिती पित्याला । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥ २ ॥

लग्न झालें तरी स्वभावतः विरक्त विठ्ठलपंतांचें मन संसारांत रमेना. पु झाल्याशिवाय संन्यास घ्यावयास स्त्री तर अनुमति देईना. शेवटी 'गंगेवर (गांव नदीवर) जातों' असें कामांत गुंतलेल्या पत्नीस सांगून तिचा 'हूं' असा शब्द गृ त्यागास परवानगी मानून पंतांनीं काशीस जाऊन 'मला कोणीहि नातेवाईक नाहीं असें खोटें सांगून रामानंदस्वामींकडून सन्यासदीक्षा मिळविली; पण ते स्वामी यात्रेनिमित्त आळंदीला आले असतां विठ्ठलपंतांच्या स्त्रीकडून—रुक्मिणीकडून त्यांन कळलें कीं, बारा वर्षांपूर्वी संन्यासदीक्षा दिलेला चैतन्य म्हणजे हिचा पति! त्यांनीं ताबडतोब तिला काशीला नेलें व पतीच्या स्वाधीन करून त्याला पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारण्यास आज्ञा केली. खरें कितीहि लपविण्याचा प्रयत्न केला तरी तें बाहेर पडतेंच

भाषण विरक्तीच्या पोटीं करावें लागल्यामुळें क्षम्य ठरलें. अशी विरक्त मातापितरेंच संतास अवतार घेण्यास आवडतात.

विरिंचि-माया-हरही निघाले । सोपान मुक्ता नि निवृत्ति झाले ॥
भावंड ज्यां साह्य करावयाला । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥ ३ ॥

भगवान् विष्णु भूतलावर ज्ञानप्रसार करण्यास अवतरणार असें ठरल्यावर त्यांना साह्य करण्यासाठीं श्रीशंकर, निवृत्तिरूपानें वडीलभाऊ म्हणून प्रथम अवतरले व पुन ब्रह्मदेव सोपानरूपानें व योगमाया मुक्तारूपानें, भावंडें म्हणून अवतरलीं. घरांतल्या कर्त्या पुरुषानें एकादें कार्य आरंभलें तर त्याला घरांतील सर्व मंडळींनीं असें कार्य द्यावयाचें असतें. 'सहकार'-तत्त्व हें पुराणकालापासून जगाला 'उपकारक' म्हणून थोरांनीं प्रतिपादिलें व आचरलें आहे.

'परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ'

—गीता. अ. ३-११

'संन्यासमंतान' म्हणून ज्यांनीं । निंदा बहिष्कार जनांकडूनी ॥
धैर्ये कुटुंबासह सह्य केला । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥ ४ ॥

मातापित्यांबरोबर त्या चार भावंडांना 'संन्याशाचीं मुलें म्हणून आपल्या जातीनें वारंवार केलेली निंदा व टाकलेला बहिष्कार हीं निमूटपणें सोसावीं लागलीं. 'आलीया भोगासी असावें सादर' या साधूक्तीस अनुसरून सर्वांनीं तो छळ मोठ्या धैर्यानें सहन केला. आपत्प्रसंग हीच माणसाच्या सत्वपरीक्षेची वेळ असते. ति त्यांनें न डगमगतां यशस्वी झालें पाहिजे. वाहणारा पाण्याची मोठी लाट आली र नम्र होऊन डोकें खालीं करतो. लाट निघून जातांच पुन्हां तो डोकें वर करतो.

'आज्ञा गुरूची, न गृहाभिसक्ति । निर्मी प्रजा, ऐकुनही द्विजाति ॥
द्रवे न ज्यांच्या व्रतबंधनाला । त्या ज्ञानराजा नमु माउलीला ॥५॥

'संन्याशांच्या मुलांना व्रतबंधाचा अधिकार नाहीं' असा निवृत्ति ज्ञानदेव व सोपानदेव यांच्या व्रतबंधसंस्काराबद्दल द्विजश्रेष्ठांनीं अभिप्राय दिल्यावर विठ्ठलपंतांनीं त्यांची हात जोडून प्रार्थना केली, 'महाराज मी फिरून गृहस्थाश्रम स्वीकारला तो केवळ गुरुजींची आज्ञा म्हणूनच, आसक्तीनें नव्हे, ही गोष्ट आपण लक्षांत घेऊन आपल्या निर्णयाचा फेरविचार करून माझ्या पुत्रांचे व्रतबंधसंस्कार करून त्यांना द्विज करावें.' पण त्या ब्राह्मणांना दया आली नाहीं. न्यायदेवता ही कठोर असते हें खरें !

स्वांतीं दया ये बहुधा द्विजांतें । म्हणूनि ऐसें मनिं मायतातें ॥
यदर्थ गंगार्पण केला । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥६॥

विठ्ठलपंतांनी तेव्हां स्त्रीसह विचार केला. 'आपण देहत्याग केला तर पं मुलें म्हणून तरी ब्रह्मवृंदास दया येऊन ते आपल्या पुत्रांचे व्रतबंधास अनुकूल होत आपल्या पापाचें परिमार्जन देहत्यागानें आपणच करावें ' हा विचार पक्का होऊन रात्रीं त्रिंबकेश्वरांतील आपल्या निवासांतून दोघे, मुलें झोंपल्यावर गुपचुप का चालती झाली व तेथें भागीरथीस आपला देह त्यांनीं अर्पण केला. केवढी अपत्यांबद्दल कळकळ !

जातां निराधार असे त्यजूनी । मातापिता, या जगीं दीनवाणी ॥
जे धीर देती अनुजद्वयाला । त्या ज्ञानराजा नमुं माऊलीला ॥ ७ ॥

अशाप्रकारें मातापिता नाहींसे झाले असतां ज्ञानोबांनीं आपलें दुःख गि निवृत्ति बाहेर भिक्षेस गेले असतां धाकट्या भावंडांस सोपानदेवास व मुक्ताबाईंस दिला. वडील भावाचें कर्तव्य केलें.

जें प्रार्थितां बंधुसवें द्विजातें । फिरून, मुंजीस्तव बोलले ते ॥
'न धर्म्य, हो, संतति ना तुम्हांला ' । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥ ८

आपल्या मुंजी लावण्याबद्दल ब्रह्मवृंदाची त्या पोरक्या मुलांनी फिरून प्रा केली असतां त्यांना ब्राह्मण म्हणाले, 'बाळांनों काय करावें ? धर्मशास्त्रास ही संमत नाहीं. आतां तुम्हीं ही गोष्ट मात्र अवश्य करा. ती म्हणजे विवाह न क कारण विवाहामुळें तुमच्या होणाऱ्या संततीस तुमच्यासारखेच किंबहुना जास्तीच सोसावे लागतील. जा बरें. '

रेड्याप्रती ताडनें रक्त ज्यांतें । जें तन्मुखें घोषविती श्रुतीतें ॥
करावया लज्जित दुर्जनाला । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥९॥

ब्राह्मणांचा प्रतिकूल निर्णय ऐकूनहि प्रसन्न मुद्रेनें हीं भावंडें चाललीं अ कोणीतरी त्यांना त्यांचीं नांवें विचारलीं. प्रत्येकानें आपलें नांव क्रमानें सांगितलें.

निवृत्ति : मी सर्व देवांचें अध्ययन केलें असल्यामुळें मला ज्ञानदेव म्हणतात.

सोपानदेव : भक्तीच्या सोपानानें म्हणजे जिन्यानें परलोकाचें साधन करणारा असल्यामुळें मला सोपानदेव म्हणतात.

मुक्ताबाई : जगाला मुक्तीचा मार्ग दाखविण्यासाठी मीं जन्माला आले म्ह माझें नांव मुक्ताबाई.

लोक सभोंवार जमले होते. त्यांतून एकानें एक पखाल पाठीवर नेणारा जातांना पाहिला. तो म्हणाला 'काय पण नांवें ! म्हणे ज्ञानदेव ! या रेड्यालाही ज्ञा म्हणतात. दोघेहि सारखेच झाले कीं; एक माणूस व एक पशु !

ज्ञानदेव : खरोखर दोघांकडे अन्तरदृष्टीनें पाहिलं तर कांहीं फरक नाहीं; दोघांतहि परमेश्वर सारखाच भरला आहे.

तो माणूस : मग या रेड्याला या काठीनें मारलें तर तुला लागेल कीं काय? पहा मी सोटा मारतों!

आश्चर्य! सोटा रेड्याला व रक्त वाहूं लागलें ज्ञानदेवांचे पाठींतून. कांहीं अंतर झाल्यावर एकानें कुचेष्टेनें विचारलें 'मग हा रेडा तुमच्याप्रमाणेंच वेदघोषहि करूं शकेल.'

ज्ञानदेव म्हणाले 'अवश्य!' त्यांनीं त्या रेड्याच्या कानांत कांहीं सांगितल्यावर त्यानें तोंड उघडून अस्खलित वेदघोष केला! चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं. या चमत्कारामुळें लोक त्यांचें भोंवती गोळा झाले व ज्ञानप्रसाराचें त्यांचें कार्य सुकर झालें. खट्याळ मुलगा खाऊ दाखविल्याशिवाय अभ्यासास बसत नाहीं.

प्रविष्ट जो नाथपरंपरेंत। त्या अग्रजाच्या चढुनी कृपेंत॥
अमर्त्य काव्यें दिधली जगाला। त्या ज्ञानराजा नमुं माउलीला॥१०॥

ब्रह्मगिरीच्या प्रदक्षिणा आईवडिलांबरोबर करीत असतां निवृत्ति चुकले व एका गुहेंत शिरले. तेथें नाथपरंपरेंतील गहिनीनाथ दैवयोगानें होते. त्यांनीं त्यांचा सांभाळ करून त्यांच्यावर अनुग्रह करून त्यांना आईवडिलांकडे धाडून दिलें. आईवडील नाहींसे झाल्यावर व आपल्या मुंजी लागत नाहींत असें निश्चित कळल्यावर ज्ञानोबांनी त्या आपल्या वडील भावाकडून अनुग्रह घेतला व त्यांच्या प्रसादानें ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव—पासष्टी यासारखीं अमर काव्यें रचिलीं. संकट आलें तर त्यांतूनहि कांहीं तरी विशेष कार्य उद्योगी माणसास करतां येतें. अशावेळीं धीराचीं माणसें कपाळाला हात लावून रडत बसत नाहींत.

गीतार्थ तो संस्कृत, तो अडाणी। असंख्य लोकां न कळे म्हणूनी॥
तो मायबोलींत सुबोध केला। त्या ज्ञानराजा नमुं माउलीला॥११॥

गीताशय केवळ संस्कृतज्ञ पंडितांस कळत असे. त्यांनीं तो प्रवचनपुराणांतून स्पष्ट केला तरच तो सामान्य लोकांना कळणार ही परावलंबी स्थिति ज्ञानोबांनीं जाणून तो मराठींत आपल्या मायबोलींत सुंदर समर्पक दृष्टान्त जागोजाग देऊन लोकांना सहज समजेल व आवडेल अशा गोड भाषेंत उकलून दाखविला. हा अनुवाद म्हणजेच ज्ञानेश्वरी. तो कोणीही वाचावी, अभ्यासावी, मनन करावी व सद्गति मिळवावी.

मांड्यास ना खापर देइ कोणी। धाकें खलाचे, तव पृष्ठि ज्यांनीं॥
प्रदीप्त केलें जठरानलाला। त्या ज्ञानराजा नमुं माउलीला॥१२॥

ज्ञानदेवांनी एकदां सहज मुक्ताबाईस म्हटलें 'आज मांडे कर.' मांडे भाजण्या-

साठीं खापर घरांत नव्हतें. तें आणण्यासाठीं ती कुंभारवाड्याकडे निघाली. वा
विसोबा चाट्यानें तिला 'कुठें जातेस ग पोरी ?' म्हणून हटकलें. तिनें 'खापर आ
ण्यासाठीं चाललें' सांगतांच या संन्याशांच्या मुलांस त्रास देण्यास ही संधि चांग
आहे असे पाहून तो कुंभारवाड्यांत गेला व सर्वांना मुक्ताला खापर न देण्याबद्दल द
भरला. ब्राह्मणाचा धाक मोठा ! मुक्ता बिचारी रडत परत घरीं आली व ज्ञानोबां
हकीगत सांगितली. ते तावडतोब ओणवे झाले. जठराग्नि पेटवून त्यांनीं आपली पा
तव्यासारखी लाल केली व ते बहिणीला म्हणाले 'आज आतां पाठीवर मांडे !' विठो
खिडकींतून तें दृश्य पाहून लाजला व ज्ञानोबांच्या पाया पडला. 'खळाला व्यंक
( वांकडेपणा ) सोडावयास' लावण्याचें सामर्थ्य संतांत असतें.

व्याघ्रावरी, सर्प करीं, सगर्व । येतां असा तो यति चांगदेव ॥
जे चालवीती जड भित्तिकेला । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥ १३ ॥

प्रदीर्घ तप केलेला, अनेक सिद्धि मिळविलेला व चवदाशें वर्षें वया
योगिराज चांगदेव आपलें सामर्थ्याचें प्रदर्शन करण्यासाठीं वाघावर बसून व हाता
सापाचा चाबूक घेऊन ज्ञानोबांना भेटावयास येत असतां ते भावंडांसह बसलेल्या ज
भिंतीलाच चालवून त्याला सामोरे गेले व त्याचा गर्व हरण केला. शेरास सव्वा शे
केव्हां तरी भेटतोच ! व असा भेटला म्हणजे गर्व सपशेल खालीं येतो.

जी दावि आत्मा, वितरीहि शान्ति । हरी तथा शोक विमोह भीति ॥
ज्ञानेश्वरी अर्पिति ती आम्हांला । त्या ज्ञानराजा नमुं माउलीला ॥१४॥

आपणांस 'आपण कोण' याची नीट ओळख करून देणारी, मरणाची भीति
देह–गेह–कामिनी–कांचनाचा–संसाराचा मोह व मृत आप्तांसंबंधीं अगर नष्ट वस्तूंविषयीं
शोक हीं सर्व दूर करणारी व मनाला खरी शान्ति देणारी ज्ञानेश्वरी आम्हांला कृपाळूपणें
अर्पण करणाऱ्या ज्ञानोबा माउलींना शतशः प्रणाम असोत.

# भरताचें निस्सीम बंधु-प्रेम

कौसल्येनें दशरथाच्या मृतदेहाला मिठी मारिली आणि तिनें आक्रोश केला. "महाराजांबरोबर मीहि परलोकांत जाईन. माझ्या पुत्राविना आणि पतीविना कशी जगूं?"

राजप्रासादांतील वृद्धांनीं व मानकऱ्यांनीं कसेंबसें तिला राजाच्या मृतदेहापासून ढवून दूर नेलें. नंतर त्यांनीं अंत्यसंस्काराबद्दल बोलणीं केलीं. अंत्यसंस्कार ताबडतोब तां येणार नाहीं, कारण राम व लक्ष्मण वनांत गेलेले, तर भरत व शत्रुघ्न दूर जोळघरी. मग असें ठरलें, कीं भरताला निरोप पाठवावा आणि तो येईपर्यंत राजाचा तेलांत ठेवून द्यावा.

अशा प्रकारें राजाचा देह भरताच्या आगमनाची वाट पाहात ठेवण्यांत आला. योध्या ही वैभवसंपन्न नगरी होती. परंतु, आतां ती अंधारांत व शोकांत बुडून गेली. या एकमेकींना भेटत होत्या व कैकेयीला नांवें ठेवीत होत्या. सर्व पुरुषांच्या हृदयांत ळजीनें घर केलें होतें. युवराजपदावर बसणारा राजपुत्र अरण्यांत निघून गेलेला. तही नगरींत नव्हता. सर्वांना वाटलें, आतां अनागोंदी पसरेल. सर्वजण भयभीत ले होते, कारण राजाविना राज्य चालूं शकेल, अशी कल्पनाच त्या काळीं गास नव्हती.

शेवटीं एकदांची ती दीर्घ रात्र संपली. अमात्य मंडळी, मानकरी लोक व ोलधारी माणसें दरबारांत एकत्र जमलीं. मार्कंडेय, वामदेव, काश्यप, कात्यायन, म, जाबाली आणि इतर विद्वज्जनांनीं सुमंत्र व इतर अमात्यांसह वसिष्ठाला प्रणाम । व ते म्हणाले,

"महर्षे, काल व्यतीत केलेली एक रात्र म्हणजे शंभर वर्षांसारखी होती. महा- आतां नाहींत. राम-लक्ष्मण वनांत गेले आहेत. भरत-शत्रुघ्न दूर आजोळीं आहेत.

राजदंड दातीं घेण्याकरितां ताबडतोब कोणाला तरी बोलावूक घेतलं पाहिजे. राजावि राज्य टिकूं शकत नाहीं. सर्व सुव्यवस्था नाहींशी होईल, मुलं पित्याचं ऐकणार नाहीं पत्नीचं पती वचन पाळणार नाहीं. पाऊस पडणं बंद होईल. चोर-दरोडेखोर धुमाकू माजवितील. प्रजेंत परस्पर विश्वास राहाणार नाहीं. शेती व व्यापार कशाची भरभराट होणार नाहीं. राजा नसेल तर देशाचं वैभवच नाहीं होईल, औदार्याचे झरे आटून जातील. मंदिरांतील पुजोत्सव बंद पडतील यात्राव कथाकीर्तनं होणार नाहींत, प्रवचनाना श्रोते मिळणार नाहींत. लोक दारं उघडी ठेवू झोंपणार नाहींत. संस्कृतीचा अधःपात होईल व लवकरच ती लोप पावेल. व्रतंवैकल्य प्रतिज्ञा, सुखोपभोग, विद्या हें सर्व कांहीं राजाच्या आश्रयावर अवलंबून असतं. स्त्रियां सौंदर्य नष्ट होऊन जाईल. सुरक्षिततेची भावनाच नाहींशी होईल. लोक माशांप्रमाण एकमेकांस खाऊं लागतील. क्रौर्य आणि दैन्य सर्वत्र फैलावेल आणि भूमि ओसाव होऊन जाईल. भल्याच्या उत्कर्षांकरतां व बुऱ्याच्या नियमनाकरतां, राजा असण आवश्यक आहे."

अशा प्रकारें अराजकतेचे धोके दशरथाच्या दरबारी-मंडळींकडून वाल्मीवि विस्तारानें वदवितात.

"घोर अंधःकारानें भूमि व्यापून टाकली आहेसं वाटतं. धर्म धोक्यांत आहे ताबडतोब सिंहासनावर कोणाची तरी स्थापना करा", असें ते म्हणाले. वसिष्ठमुनींनी ताबडतोब कुशल दूतांस पाचारण केले व ते त्यांना म्हणाले, "तुम्ही तात्काळ येथून रवाना व्हा. तडक व जलद गतीनें केकयास जा. आपल्या मुखावर वा वर्तनांत दुःखाची छटा असणार नाहीं याची दक्षता बाळगा. महाराजांच्या मृत्यूची कल्पना भरतास येतां कामा नये. त्याला फक्त एवढंच सांगा की राजगुरूंनीं व अमात्यमंडळींनीं तुला ताबडतोब अयोध्येस बोलावलं आहे आणि त्याला आपल्याबरोबरच घेऊन तुम्ही तांतडीनें परत प्रयाण करा. राम-सीतेच्या वनवासाबद्दल व त्या शोकानें झालेल्या महाराजांच्या अंताबद्दल त्याला कांहीं बोलू नका. त्याला संशय येऊं नये म्हणून केकयाधिपतीकरितां रत्न-वस्त्रांचे नजराणेहि घेऊन जा."

शास्त्रें व कुशल सत्याविषयीं जें सांगाल, त्याचा अर्थ यावरून आपल्या ध्यानांत येतो. सत्यनिष्ठा अशी हवी, कीं जी अनावश्यकपणें जगातील कोणालाच दुखवीत नाहीं. सत्यनिष्ठेबरोबर सर्वच सदाचाराची कसोटी हीच, कीं तें कोणालाच अपाय करीत नाहीं. सत्याशीं प्रतारणा केली आहे, असा ह्याचा अर्थ नव्हे.

लवकरच दूत तयार झाले. दूरच्या प्रवासाकरितां सर्व सामुग्री बरोबर घेतली. नजराणेहि बरोबर घेतले. मजबूत आणि जलद घोड्यांवर स्वार होऊन, नद्या व अरण्यें मागें टाकून, कित्येक पर्वत ओलांडून ते केकयदेशास पोंहोचले. केकयदेश

पंजापच्या पश्चिमेस होता. राजगृह ही त्या देशाची राजधानानी होती. तेथेंच इक्ष्वाकु कुळांतील ते दोघे राजपुत्र आपल्या आजोळीं रहात होते. दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत थांबून मगच राजपुत्राना भेटण्याचें त्यांनीं ठरविलें.

दूत ज्या रात्रीं नगरींत पोंहोंचले, त्या रात्रीं भरतास वाईट स्वप्नें पडलीं. सकाळीं तो उठला तेव्हां काल रात्रीं आपल्याला पडलेल्या स्वप्नांचा अर्थ काय असेल, याची चिंता त्याला पडली. त्याच्या मनांतील ही चिंता त्याच्या चेहेऱ्यावर उमटली होती. सख्यांनीं नाचून-गाऊन त्याचें मन रिझविण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्यांना यश लाभलें नाहीं.

मानवी स्वभावाचीं सर्व रहस्यें आपल्याला अद्यापि माहीत नाहींत. परस्पर प्रेम असलेल्या दोन व्यक्तींना संदेश आपोआप कसे पोहोंचविले जातात, हेंहि आपल्याला अज्ञातच आहे. कदाचित् दशरथाच्या मनांतील दुःख व त्याला झालेल्या मृत्युवेदना आकाशांतून प्रवास करीत भरतापर्यंत पोंहोंचल्या असतील व त्यामुळें भरतास वाईट वाईट स्वप्नं पडलीं असतील. भरत स्वतःशींच म्हणाला, ' राम, लक्ष्मण किंवा मी स्वतः-आमच्यापैकीं कोणाच्यातरी समीप मृत्यु येत आहेसं वाटतं. पहाटे पडलेलं स्वप्न खोटं ठरत नाहीं असें म्हणतात आणि माझं स्वप्न तर भयंकरच होतं. मी तर भयभीतच झालों आहे. काय करावं कांहीं कळत नाही. '

ह्याच वेळीं अयोध्येकडून दूत आल्याची वार्ता दरबारांत आली. केकयदेशचे महाराज व राजपुत्र युद्धाजित् यांनीं योग्य त्या मानसन्मानानें त्या दूतांचें स्वागत केलं. त्यांनीं महाराजांस व युद्धाजितास प्रणाम केला व ते भरताकडे वळले.

" राजर्षींनी व अमात्यांनीं तुला आपले आशीर्वाद पाठविले आहेत व तातडतोब तुला अयोध्येला परत बोलावलं आहे. तुझी उपस्थिति अत्यावश्यक आहे, असा निरोप त्यांनीं आमच्याकरवीं पाठविला आहे. निरोप पोहोंचल्याची खूण म्हणून महाराजांकरितां अयोध्येहून आम्हीं घेऊन आलेल्या ह्या नजराण्यास तूं स्पर्श कर. "

भरतानें घरच्या सर्वांचें कुशल त्यांना विचारलें. त्याच्या विचारण्याच्या पद्धतीवरून आपली आई दुराग्रही व महत्त्वाकांक्षी स्त्री आहे, त्याचा या तांतडीच्या निरोपाशीं कांहीं संबंध असावा, अशी शंका त्याच्या मनांत डोकावली असल्याचें सूचित होतें. " आणि स्वतःला सर्वज्ञ समजणारी व मनोरथ पूर्ण करून घेणारी हट्टी तशीच संतापी राणी कैकेयी, माझी आई, कुशल आहे ना ? "

भरताच्या प्रश्नांना उत्तर देतां देतां त्या दूतांच्या नाकीं नऊ आले असले पाहिजेत. कसेंबसें एवढेंच सांगूं शकले, " हे पुरुषव्याघ्रा, तुला ज्यांच्या कुशलाची चिंता आहे, तें सर्व कुशल आहेत. कमळांत राहाणारी, ऐश्वर्याची देवी जी लक्ष्मी, ती तुझी प्रतीक्षा करीत आहे. तेव्हां वेळ न घालवितां रथांत प्रवेश कर. " ह्या

बोलण्यांत रहस्यमय गूढ होतें, कारण त्यांच्या मतें भरताला राज्याभिषेक व्हावयाचा होता.

भरतानें आपल्या मामाचा व आजोबांचा निरोप घेतला व त्याच्या प्रयाणाची सर्व सिद्धता करण्यांत आली. राजा दशरथ व युवराज राम यांना भेट देण्याकरितां आपल्या देशांतील मौल्यवान वस्तू गोळा केल्या. भरत शत्रुघ्न आपापल्या रथांत चढले व मोठ्या लवाजम्यासह त्यांनीं अयोध्येकडे कूच केलें. थकवा आला तरी विश्रांति न घेतां जलद गतीनें त्यांनीं प्रवास केला व आठव्या दिवशीं सकाळीं ते अयोध्येस पोंहोंचले.

नगरीच्या जवळ आल्यावर भरताचें मन शंकाकुल झालें. कांहींच पूर्वीसारखें दिसत नव्हतें, संकटाच्या सूचनेनें वातावरण जड झाल्यासारखें वाटत होतें. त्यानें सारथ्याला विचारलें, "सार्‍या नगरींत हें असें विचित्र वातावरण कां? रस्त्यावर नेहमींप्रमाणें लोकांची गर्दी दिसत नाहीं. नगरीबाहेरील उद्यानांत पूर्वी तेजःपुंज आनंदी चेहेरे असलेले तरुण स्त्री-पुरुष दिसत असत. आतां ते उदास झाल्यासारखे वाटतात."

भरताच्या रथानें विजयद्वारांतून नगरींत प्रवेश केला. रस्ते, घरें व देवळें रिकामीं व अनलंकृत होतीं. लोकांचे चेहेरे ओढलेले व ग्रस्त होते.

"सर्व वाद्यं आज गप्प कां?" भरतानें विचारलें, "लोकांच्या गळ्यांत फुलांच्या माळा कां नाहींत? अंगावर चंदनाचे लेप कां नाहींत? हीं सर्व अशुभ लक्षणं आहेत. आतां माझी चिंता दाबून ठेवणं मला शक्यच नाहीं."

अपशकुन सर्वत्रच दिसून आले. नगरीवर कांहींतरी महान् दुर्दैव कोसळलें आहे, म्हणूनच आपल्याला इतक्या तांतडीनें बोलावून घेण्यांत आलें आहे, असा निष्कर्ष भरतानें काढला. त्यानें दशरथाच्या प्रासादांत प्रवेश केला. तेथें त्याला दशरथ दिसला नाहीं. त्याची चिंता अधिकच वाढली.

मग त्यानें कैकेयीच्या प्रासादांत प्रवेश केला. इतक्या दिवसांनंतर आपल्या मुलाला पाहिल्याबरोबर त्याला आलिंगन देण्याकरितां कैकेयीनें आपल्या सुवर्णासनावरून खालीं उडी मारिली. त्यानें तिच्या पायांस हात लावून तिला प्रणाम केला. तिनें त्याच्या मस्तकाचें चुंबन घेतलें व त्याला प्रेमळ आशीर्वाद दिले.

"तुझा प्रवास ठीक झाला ना?" तिनें विचारलें, "आणि तुझे मामा व आजोबा कुशल आहेत ना? मला सर्व कांहीं सांग बरं."

भरत उत्तरला, "प्रवासाला सात दिवस लागले. केकयांतील आपली सर्व माणसं सुखरूप आहेत, आनंदांत आहेत. आजोबांनीं व मामांनीं प्रेमभरानें तुला आशीर्वाद

सांगितले आहेत. तुझ्याकरितां खूप मारी भेटीहि दिल्या आहेत; परंतु त्या नंतर येऊन पोंहोंचतील. मी पुढें आलों आहे. दूतांनीं फारच घाई केली. मी ताबडतोब पोंहोंचायला हवं, असं त्यांनीं सांगितलें. हा सर्व प्रकार काय आहे? महाराजांना प्रणाम करण्याकरतां मी त्यांच्या प्रासादांत गेलों, तर ते तिथें नव्हते आणि इथेंहि पाहातों तों त्यांचं आसन रिकामंच! कदाचित् ते थोरल्या मातांच्या प्रासादांत असतील. मला प्रथम त्यांना भेटून प्रणाम करायला हवा."

निष्पाप अंतकरणाच्या भरतानें घडलेल्या प्रसंगांची कांहींच कल्पना नसल्यामुळें असें म्हटलें आणि सत्तेच्या नव्या जाणीवेनें उन्मत्त झालेली ती मूर्ख राणी उत्तरली, "बाळा, आयुष्यांत वाट्याला यावं तेवढं सगळं कांहीं तुझ्या वडलांना मिळालं. त्यांची कीर्ति दिगंत होती. परंपरेनें चालत आलेले सर्व यज्ञ त्यांनीं पार पाडले होते. जें जें म्हणून चांगलें होतं, त्याचं ते आश्रयस्थान होते. आतां त्यांनीं याहून वरच्या लोकांत प्रवेश केला आहे. ते आतां देवांचे सांगाती झाले आहेत."

हें ऐकून भरत एक किंकाळी फोडून धाडदिशीं खालीं कोसळला. त्याचे लांब सडक हात जमिनीवर पसरलेले होते. परत उठून त्यानें आपल्या वडिलांच्या रिकाम्या मंचकाकडे पाहिलें व एखाद्या पोरक्या, अनाथ पोरासारखा हो ओक्साबोक्शीं रडूं लागला. त्या वीर पुरुषानें आपलं देवसदृश अंग जमिनीवर फेकलें व अनिवार दुःखानें रडणाऱ्या बालकासारखा तो रडत राहिला.

कुऱ्हाडीनें तोडलेल्या प्रचंड वृक्षासारख्या जमिनीवर पडलेल्या आपल्या मुलाकडे पाहून कैकेयी म्हणाली,

"हे राजा, ऊठ. उठून उभा रहा. असं रडणं व जमिनीवर लोळणं राजाला शोभत नाहीं. मानसन्मान आणि वैभव तुझ्या स्वीकाराची वाट पाहात आहेत. तुझ्या पूर्वजांप्रमाणेंच तुलाही धर्माचं अभ्युत्थान करायचं आहे, यज्ञयाग करायचे आहेत. तुझी बुद्धि मध्यान्हींच्या सूर्यासारखी तळपती आहे. कसलंच दुर्दैव तुझ्याजवळ येण्यासही धजणार नाहीं. बाळा, तूं अंगानें सशक्त व अंतःकरणानें शूर आहेस, तूं ऊठ."

भरताचें मन निर्मळ होतें; कैकयीनें त्या आपल्या म्हणण्यांत जें कांहीं घातलें होतें, तें त्याला दिसलेंच नाहीं.

बराच वेळ शोक करून तो उठून उभा राहिला व म्हणाला, "मी जेव्हां आजोळीं गेलों, तेव्हां मला वाटलं होतं, रामाचा यौवराज्याभिषेक ठीक पार पडेल व परत आल्यावर नगरींत आनंदोत्सव चाललेला आपल्याला पाहावयास मिळेल. परंतु, घटना किती वेगळ्या प्रकारें घडून आल्या आहेत! हें संकट आतां मी कसं सहन करूं? माझ्या पित्याचं मुख आतां परत कधींच माझ्या दृष्टीस पडणार नाहीं. ते कसे वारले? कशानें? ते मुळीं आजारीच कसे पडले? आणि ते

आजारी असतांना मी त्यांच्या शय्येशेजारी नव्हतों! त्यांच्या शेवटच्या काळांत त्यांची सेवा करण्याचं भाग्य रामाच्या वांट्यास आलं. महाराज माझ्यावर किती माया करीत! माझ्या अंगाला साधी थोडी धूळ लागली, तरी ती ते आपल्या हातानें पुसून टाकीत आणि त्यांचा स्पर्श तरी किती मृदु व सुखद होता? आणि त्यांना जरूर होती तेव्हां त्यांची सेवा करण्याच माझ्या नशिबी नव्हतं. परंतु आई, राम कुठें आहे? येथपासून पुढें तर तोच माझा पिता आणि गुरु! मला तात्काळ त्याच्याकडे जाऊन त्याच्या पायांचं चुंबन घेतलं पाहिजे. आतां तोच माझा एकमेव आसरा आहे. माझ्या वडलांनीं शेवटीं माझ्याकरतां काय आदेश मागें ठेवला आहे? मला त्यांचेच शब्द जसेच्या तसे हवेत."

कैकेयीचें उत्तर सत्य आणि तिच्या मनांतील कावा या दोहोंचा मेळ घालणारें असावयास हवें होतें. संस्कारांनीं व महत्त्वाकांक्षेनें तिला दोन विरुद्ध बाजूंना ओढलें. आपल्या शेवटच्या क्षणीं दशरथच्या मनांत भरताचे विचार नव्हते, असें सांगण्याकरितां तिला शब्द मिळाले. उरलेली वार्ता ऐकण्याकरितांही भरताला तयार करावें, असें तिला वाटलें. ती म्हणाली, "भरता, हाय रामा, हाय लक्ष्मणा, हाय सीते', असं म्हणत तुझ्या पित्यानें प्राण सोडला. त्यांचे अखेरचे शब्द असे होते: 'राम, लक्ष्मण आणि सीता यांना परत आलेली पाहण्याचं माझ्या नशिबी नाहीं. त्यांना परत आलेली ज्यांना पहाण्यास मिळेल, ते धन्य होत!"

हें ऐकून भरत समजला कीं मृत्युसमयीं राम—लक्ष्मणहि महाराजांपाशीं नव्हते. त्याचें दुःख जास्तच वाढलें आणि त्यानें कैकेयीला विचारलें, "ते कुठें आहेत? आणि वडील शेवटच्या घटका मोजीत असतां अशा कोणत्या कामगिरीवर ते अयोध्येतून दूर गेले?"

त्याला शांत करण्याची आशा बाळगून कैकेयी म्हणाली, "बाळा, रामानें तपस्व्याचीं वल्कलं धारण केलीं व लक्ष्मण—सीतेला बरोबर घेऊन तो दंडकारण्यांत गेला."

भरताच्या विस्मयास पारावार राहिला नाहीं. त्यानें विचारलें, "तूं काय म्हणत आहेस, तें मला मुळींच कळत नाहीं. एवढं मोठं प्रायश्चित घेण्याजोगं कोणतं पाप रामानें केलें? त्यानें कोणा ब्राह्मणाला लुटलं, कीं कोणा निरपराध व्यक्तीला देहदंड दिला, कीं दुसऱ्या कोणाच्या पत्नीची कामना धरली? कां म्हणून त्याला अरण्यांत जावं लागलं? हें प्रायश्चित्त त्याच्यावर कुणीं लादलं?"

त्या काळीं लोक स्वेच्छेनें वनवास पत्करीत किंवा अशा प्रकारच्या अपराधाची शिक्षा म्हणून त्यांना वनांत पाठविलें जाई. प्रश्नांच्या ह्या सरबत्तीनें कैकेईचें मौन भंगलें व यांतून कांहीं वाईट निष्पन्न होणार नाहीं, अशी सूक्ष्म आशा बाळगीत तिनें सत्याला वाचा फोडली.

"रावानें कांहीं अपराध केला नव्हता. त्यानें कुणाला लुटलं नव्हतं की इजा केली नव्हती. आणि दुसऱ्याच्या पत्नीवर नजर टाकणें तर रामाच्या स्वभावांतच नाहीं. असं झालं, कीं रामाला यौवराज्याभिषेक करण्याची तयारी सुरू झालेली मी पाहिली, तेव्हां मी महाराजांकडे गेलें आणि त्यांनीं खूप पूर्वी मला दिलेले दोन वर सिद्ध करण्याची मागणी केली. तुला राज्य मिळावं व रामाला वनवासांत पाठवावं, असे दोन वर मी मागितले. पूर्वीच दिलेल्या वचनानें बद्ध असल्यानें महाराज कबूल झाले. म्हणून सीता व लक्ष्मण यांच्या समवेत राम वनांत गेला आहे. हा विरह सहन न झाल्यानें तुझे वडील शोकाकुल होऊन त्यांतच त्यांचं प्राणोत्क्रमण झालें. आतां तूं व्यर्थ दुःखांत आपला वेळ दवडूं नकोस. आतां आपल्या कर्तव्याविषयीं विचार कर. तूं धर्म जाणतोस. तेव्हां राज्यधुरा आपल्या खांद्यावर घेणं, हें तुझें कर्तव्य आहे. हें सर्व मी तुझ्याकरतांच केलं आणि माझ्या कृत्याचं हें फळ तूं आतां मी ज्या भावनेनें वागलें त्याच भावनेनें स्वीकार. इच्छा वा कष्ट केल्याविना ही नगरी व अखिल साम्राज्य तुझ्या हातीं आलीं आहेत. वसिष्ठमुनींच्या व इतर विद्वजनांच्या सांगण्यानुसार आतां पित्याचा अंत्यविधि उरकून राज्याभिषेकाकरितां तूं सिद्ध हो. तूं क्षत्रिय आहेस. आपल्या वडलांपासून साम्राज्याचा वारसा तुला मिळाला आहे. कर्तव्य म्हणून जें तुझ्यासमोर आलं आहे. ते नीट पार पाड."

---

# श्री एकनाथमहाराज आणि चमत्कार

एकनाथानीं अद्‌भुत चमत्कार कोणते केले ते पाहूं. एकनाथाच्या अमानुष कृत्यांचा विचार करण्यापूर्वी येथें ही एक गोष्ट सांगणें अवश्य आहे कीं, आमच्या वाचकांपैकीं कित्येक अशी पृच्छा करितील कीं, ह्या सुधारणुकेच्या शिखरात पोंचलेल्या एकोणिसाव्या शतकांत आकाशवाणी, दत्तात्रेयदर्शन, अद्‌भुत चमत्कार, अशीं सदरें ठोकून असंभाव्या गोष्टी लिहिण्यानें ग्रंथ विटाळावा, हें शास्त्रोक्त कसें ठरेल? तर अशा प्रकारच्या पृच्छकांस आमचें सांगणें हें आहे कीं, ह्या गोष्टी लिहिण्याची आमचीं साधक बाधक कारणें आहेत तीं प्रथम देऊन नंतर प्रकृत भागास आरंभ केला आहे. तीं कारणें वाणूनही जर कित्येक वाचकांस अद्‌भुत गोष्टींच्या वर्णनानें ग्रंथ विटाळला असें वाटेल, तर त्यांनीं स्पर्शास्पर्शदोष न लागावा म्हणून, हा चमत्कारवर्णनाचा भाग सोडून देऊन एकदम उत्तरार्ध उघडावा हें बरें. कारण, ज्यांचें रसनेंद्रिय अद्‌भुतरसास्वादनाविषयीं मुदलींच बधिर, अशा लोकांना त्या रसाच्या आस्वादनाविषयीं आग्रह करणें बरोबर नाहीं!

अद्‌भुत चमत्कार वर्णन करण्याचें पहिलें कारण हें आहे कीं:—हा निबंध एकनाथावर असून नाथचरित्र ( खुद्द एकनाथाची माहिती ) हा एक निबंधाचा प्रधान अवयव आहे. ह्याकरितां एकनाथासंबंधी ग्रथाधारानें मिळणारी सर्व प्रकारची खरी खरी माहिती देणें, सर्वथैव न्याय्य आहे. इतकेंच नव्हे, तर ही माहिती जगापुढें न मांडणें, म्हणजे चरित्रनायकाचें खरें स्वरूप जगास न दाखविण्याप्रमाणें होणार आहे. ग्रीस, रोम इत्यादि पाश्चात्यदेशीय इतिहास जरी चाळून पाहिले, तरी त्यांत सुद्धां ग्रंथारंभीं अशाच प्रकारच्या तद्देशीय अमानुष कथानकांचें दिग्दर्शन केलेलें असतें. अशाच प्रकार प्राश्चात्य साधु जे सेंट जॉन आदिकरून, त्यांच्याही चरित्रांत दृष्टीस पडतो. हा जर प्रकार इतिहासासारख्या महत्त्वाच्या पुस्तकांत व त्यांतून पाश्चात्यांच्या इतिहासांत दृष्टीस पडतो, तर बिचाऱ्या तुकोबा, ज्ञानोबा, एकनाथांनीच काय पाप केलें नकळे!

शिवाय ग्रंथांत जर ते चमत्कार दिले नाहींत, तर ग्रंथांतील एकंदर लेखाचा

विचारही रास्त रीतीनें करितां येणार नाहीं. ह्याकरितां ते चमत्कार, संक्षेपानें कां होईना, येथें देणें जरूर आहे. मग त्यांच्या खंडनमंडनाचा विचार स्वतंत्र आहे. अद्भुत चमत्कार केवळ एखाद्या विषयवर्णनाच्या अंगभूत असल्यानेंही जर तो ग्रंथ कवडीमोल किंमतीचा ठरता, तर नवनीतांतील कविचरित्रांला कधींच हरताळ लागून त्याच्या इतक्या आवृत्तिही न निघत्या; व त्याप्रमाणेंच भारतवर्षीय प्राचीन अर्वाचीन ऐतिहासिक भांडाराच्याही कधींच चिंधड्या उडाल्या असत्या. यावरून इतकें सिद्ध होतें कीं, वस्त्राभरणांनीं अलंकृत अशा सुकुमार व सुंदर युवतीच्या रूपयौवनानाच जेथें विचार कर्तव्य आहे, त्या ठिकाणीं हे दागिने खरे आहेत किंवा मुलाम्याचे आहेत, हीं तरुणी ब्राह्मणी आहे किंवा अन्यजातीय आहे, ह्यां गोष्टींची जशी मार्मिक मनुष्य मीमांसा करीत नाहीं, त्याप्रमाणेंच ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम ह्यांसारख्या जितेंद्रिय, ग्रही व ज्ञानी महापुरुषांच्या भक्तांनीं भक्तिभावानें गाइलेली उपास्यदेवांचीं अद्भुत चरित्रें वाचीत असतां, जर कोणी चमत्कारांच्या सत्यासत्यतेची मीमांसा करील, तर तो, भक्तिरसमाधुरीचें आस्वादन करणाऱ्यांच्या दृष्टीनें अरसिक ठरेल.

अद्भुत चमत्कार वर्णन करण्याचें तिसरें कारण हें आहे कीं, एखाद्या मनुष्याची एखाद्या ठिकाणीं श्रद्धा व आस्तिक्यबुद्धि बसण्याला कांहीं चमत्कारिक कारण लागतें. "चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं." ही जी ह्मण आहे ती यथार्थ आहे. अज्ञान बालकानें भाताचे दोन घांस ध्यावे एवढ्याचकरितां "बागुलबोवा" आला म्हणून जशी आईस क्लृप्ति लढवावी लागते, किंवा लहान मुलाची समजूत घालावयाची असली ह्मणजे नानाप्रकारचे भयप्रद अथवा चमत्कारिक पदार्थ दाखवून, लहान मुलाच्या हिताच्याच गोष्टी जशा युक्तीने साध्य करून घ्याव्या लागतात, त्याप्रमाणेंच महान साधूंचीं चरित्रें भक्तिरसानें व अद्भुत रसानें जर थबथबलीं नसतीं तर त्यांची महती इतकी न वाढतां ज्ञानाचा, त्यांच्या विद्येचा व अमोघ तपश्चर्येचाही जगास कांहींच उपयोग झाला नसता. मधाचें बोट दाखवून जसें मुलांकडून औषध खाववायाचें, त्याप्रमाणेंच एखाद्या व्यक्तीचें व पदार्थाचें सरस वर्णन करून जनसमूहाची दृष्टि तिकडे आकर्षण करावयाची, इतकाच भक्तांचा व स्तुतिपाठकांचा उद्देश असावा.

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, ज्या ठिकाणीं अतिशयोक्तीनें एखाद्या अधमाधर्माची उन्नति होऊन दंभ, अनाचार, दुराचरण इत्यादि गोष्टींस उत्तेजन मिळण्याचा संभव आहे, त्या ठिकाणीं अद्भुत व असंभाव्य गोष्टींचें निरंतर खंडनच केलें पाहिजे; परंतु ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, सॉक्रेटिस आदिकरून जे पुण्यपुरुष नीतीचे व सदाचरणाचे पुतळे असे अवतरले, जे स्वतः निरिच्छ असून आपलें सर्व आयुष्य ज्यांनीं तत्वबोधांत घालविलें, अशा महात्म्यांच्या अद्भुत स्तुतिस्तवनाचें मंडनच केलें पाहिजे.

एकनाथानें अदभूत चमत्कार खरोखर केले, हें सांगणें फार कठीण नाहीं. कारण जितक्या अंशानें असे चमत्कार करणें असंमाव्य आहे असे प्रतिपादन करतां येईल तितक्याच अंशाने ते संभवनीय आहेत, असेंही कबूल करावें लागेल. कारण पाश्चात्य विद्येचा संस्कार होऊन रसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र आदिकरून शास्त्रांचा कोठें थोडा बरा लागतो इतक्यांतच आमचे लोक अर्ध्या हळखुंडानें पिवळे होऊन, स्वधर्माची अवहेलना करू लागले व भूतें, पिशाच, मंत्रतंत्र सब झूट म्हणून सिद्धांत ठरला. परंतु तें सगळेंच पारडें फिरून ब्ल्याव्हाट्स्की व ऍनीबिझांट्बाईनीं व ऑल्कॉट साहेबांनीं "थिआसोफिस्ट" ची अंजनशलाका पातालांतून व पश्चिमेकडून आणून भारतीयांच्या नेत्रांत फिरविल्याबरोबर काय बहार उडाला तो पहा!! ज्या योगसाधनादि वैदिकक्रिया मिथ्या म्हणून आधुनिक विद्वानांनीं ठरविल्या होत्या, ज्या वैदिकधर्मांत मंत्रतंत्रादिक गोष्टींची रेलचेल असल्यामुळे त्या कुचकामाच्या म्हणून वेदाची पायमल्ली त्यांनीं चालवली होती तोच परिकधर्म आतां इतर धर्मांहून श्रेष्ठ, व जें कांहीं परम गुह्य ज्ञान तत्व आहेत याचा धर्मांत आहे. असा हल्लीं सिद्धांत ठरू पाहात आहे!!

मुंबापुरवासी व मद्रपुरवासी ईशज्ञानी मंडळीनीं योग, समाधि जप, तप हीं सर्व खरीं आहेत असें प्रतिपादित केलें आहे. तसेंच मानसिक चुंबकाच्या प्रभावानें व सूक्ष्मदेहामुळें संचार, आंगांत येणें, बोडणाचा प्रकार, महालक्ष्मी, करपुतळी, भूत, पिशाच, दृष्टांत, सिद्धिदर्शन इत्यादि सर्व गोष्टी मीमांसा करोत, तथापि लोकसमूहास हा साधुपुरुष किती प्रिय आहे, व ह्याचा अजरामर कीर्तिध्वज वसुंधरेवर कसा अप्रतिहत फडकत आहे, ह्यासंबंधाचा मजबूत पुरावा आज तीनशें वर्षें एकनाथाचें जीवंत स्मारक करीत आहे! ज्या रांझणांत भक्तिभावाचा भुकेलेला भगवान् पाणी भरीत असें, तो भव्य रांझण एकनाथाच्या साधुत्वाच्या अलोकिक कीर्तीची साक्ष देत, प्रतिवर्षी फाल्गुन कृष्ण षष्ठीचे दिवशीं पैठणामध्यें लक्षावधि लोकांना नाथचें स्मरण करीत आहे!! त्याप्रमाणें ह्या साधुपुरुषाच्या साधुत्वाचा परिमल दरवळून टाकणारें सहाणखोडही नाथाच्या भक्तांनीं जतन करून ठेवलें आहे!! पाश्चात्य कविकुलगुरु जो शेक्सपीयर, त्याची स्टॅटफर्ड येथील खुर्ची पाहाण्याकरितां जशी रसिकवर्गाची झड पडते, त्याप्रमाणेंच परोपकार, सहनशीलता, आत्मज्ञान, साधुत्व इत्यादि गुणांविषयीं गाजलेल्या या गोदातीरच्या अवलियाचीं रांझणासारखीं जीवंत स्मारकें अवलोकन करण्याकरीतां पैठणामध्येंही भाविकभक्तांच्या उड्या पडतात!!

न जुमाणारी, व जनसमूहास चिरकालिक हळहळ लावणारी, अशी ही अलौकिक साधुत्वाची किती विलक्षण शक्ति!! म्हणूनच समर्थ म्हणतात.

देह त्यागितां कीर्ति मागे उरावी।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी॥